

# रंगीन दुनियेचे रोमांचक अनुभव

सुप्रिया जोशी

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# रंगीन दुनियेचे रोमांचक अनुभव

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

### आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# रंगीन दुनियेचे रोमांचक अनुभव

(प्रवासकथासंग्रह)

लेखिका

## सुप्रिया जोशी

रंगीन दुनियेचे रोमांचक अनुभव

लेखिका: सुप्रिया जोशी,

व्हाट्सएप नंबर +254738475843

पत्ता- नैरोबी, केनिया

wagmayik@gmail.com

छायाचित्रे: गुगलवरून साभार

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

**प्रकाशन : २० डिसेंबर २०२०**

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे- आवश्यकआहे.



# मनोगत

नमस्कार,

आज मी खूप खुश आहे.  माझा पहिला प्रवासकथासंग्रह प्रसिद्ध होत आहे!

लहान असताना मी कथा, कविता एका वहीत लिहून ती कोणाला सापडू नये अश्या ठिकाणी लपवून ठेवायची. पण एकदा खूप पाहुणे घरी आले असताना ती वही (आईबाबा घरी नसताना) एका काकांच्या हाती पडली आणि त्यांनी त्यातल्या काही कविता सगळ्यांसमोर वाचून माझी खूप टिंगल उडवली!  मी वही ओढून घ्यायचा खूप प्रयत्न केला पण तो  निष्फळ झाला . सगळ्यांसमोर झालेला तो अपमान, अवहेलना बहुतेक  माझ्या मनाला खूप टोचून गेले असेल आणि माझे लिखाणच बंद झाले किंबहुना हा प्रसंग आणि मी लिहित होते हेपण पूर्णपणे मनाच्या कोपऱ्यातून काढून टाकले होते. त्यामुळे मी  लिहू शकते हेच मला माहित नव्हते. लग्न झाल्यावर कोणी उखाणे घ्यायला सांगितले की पटकन एखादा उखाणा तयार करायची आणि घ्यायची पण ते तेवढ्यापुरतेच.

आम्ही जेव्हा घानाला गेलो तिथून मी आई व संगीता (मोठी बहीण) ह्यांना पत्र लिहिले. त्यांनाच काय पण संगीताच्या घरच्यांनापण माझे लिखाण खूप आवडले. सगळयांनी माझे खूप म्हणजे खूपच कौतुक केले. पुढच्या पत्रात मी झुलत्या पुलाचा किस्सा लिहिला. त्यावेळी व्हाट्सएप नव्हते तरीही बहिणीने मला भारतातून फोन केला आणि अक्षरशः रडायला लागली. तिच्या सासूबाईंचे माझ्या दोन्ही मुलींवर खूप प्रेम. वाचताना त्यांच्यापण डोळ्यात पाणी आले होते म्हणे! सगळेचजण त्या दिवशी माझ्याशी बोलले. नंतर सागर माझ्या छोट्या भावाने जेव्हा हे पत्र वाचले तेव्हा मात्र तो, आई व संगिता नेहमीच मागे लागायला लागले की तू आता लिखाण सुरु कर.  पण 'आळस हा माणसाचा शत्रू असतो' ही म्हण मला लिखाणाच्या बाबतीत अगदी लागू पडली आणि त्या तिघांशी बोलणे झाले की "उद्यापासून खरेच सुरुवात करेन", हेच सांगायची. खूपदा सांगूनही मी लिहीत नाही हे बघून  एक दिवस आई म्हणाली तुझे लाडके बाबा तुमच्याकडून काम करून घेताना एक गोष्ट सांगायचे ती गोष्ट आज तू  सार्थकी लावत आहेस. मला २ मिनिट कळेचना कुठली गोष्ट असेल. पण नंतर आपोआप डोळ्यासमोर बाबा आम्हाला ही गोष्ट सांगताना दिसू लागले.

पावसाळा सुरु झाला की माकडाला स्वतःचे घर नसल्याने खूप त्रास व्हायचा, मग त्याला आसरा शोधायला सगळीकडे फिरायला

लागत असे. वाईट वाटून कोणीकोणी त्याला थोड्या दिवसांसाठी एका अटीवर आसरा देत असत. ती अट म्हणजे पावसाळा संपला की लगेच स्वतःसाठी घर बांधायचे. माकडपण पावसापासून स्वतःचे रक्षण करताना आणि आसरा शोधताना वैतागलेला असायचा, त्यामुळे लगेच मनोमन ही खूणगाठ बांधून अट मान्य करायचा आणि त्या पाहुण्यांच्या घरी थोडे दिवस राहताना मनाशी हेच ठरवायचा, 'एकदा हा पावसाळा संपू दे, मी लगेच माझे स्वतःचे घर बांधणार म्हणजे मला असे सारखे सारखे सगळ्यांकडे आसरा शोधत फिरावे लागणार नाही'.

पावसाळा संपला की तो ज्यांच्या घरी उतरलेला असेल त्यांना प्रॉमिस करून निघायचा, "पुढच्या महिन्याच्या आत माझे घर तयार असेल तेव्हा तुम्ही नक्की बघायला या". पण पाहुणे फक्त हसायचे. त्याला कळायचेच नाही की हे आपल्यावर का हसतात आणि रागावून आता ह्यांना मी माझे घर बांधून दाखवणारच हे ठरवूनच तो तिथून निघायचा.

पाऊस संपून छान वातावरण पडलेले असायचे. मग तो विचार करायचा की आता पावसाळा सुरु व्हायला अजून १ वर्ष आहे, तेव्हा आपण थोडा आराम आणि मज्जा करून उद्या घर बांधायला सुरुवात करू. दुसरा दिवस उजाडला की परत तो हेच ठरवायचा की

उद्या नक्की मी घर बांधायला सुरुवात करणारच. पण तो उद्या कधीच उजाडत नाही आणि माकड काही घर बांधत नाही.

आम्ही जेव्हापण अभ्यास, हातातले काम लगेच संपवायला कंटाळा करायचो आणि उद्या नक्की पूर्ण करते हे म्हणायचो तेव्हा बाबा ही गोष्ट सांगायचे आणि आम्ही गुपचूप ते काम लगेच संपवायचो.

एकदा असेच बसले असताना काहीतरी सुचले आणि ते लगेच कागदावर उतरून काढले. नंतर तीच गोष्ट मी जान्हवी, आर्या व ह्यांना वाचून दाखवली.. त्यावेळी दोघी फार मोठ्या नव्हत्या पण तरीही त्यांना (दोघींनाही गोष्टी ऐकायला खूप आवडायच्या म्हणून असेल) खूपच आवडली, हेतर एकदम भावविभोर झाले.. त्यानंतर मात्र शाळेतून घरी आल्याआल्या,"आई आज कुठली नवीन गोष्ट लिहिलीस?" हा पहिला प्रश्न विचारायच्या. त्यावर मी 'आज नाही ग लिहिले काही' हे ऐकून ऐकून तिघेही थकले.

एक दिवस हे ऑफिसमधून येताना नवीन वही घेऊन आले आणि मला आता रोज ह्यात नवीन काहीतरी तू लिहिलेले हवे आहेस असे धमकावलेच. मग काय मी आपली गरीब गाय. त्याच दिवसापासून पतीची आज्ञा शिरसावन्द्य मानून रोज एक नवीन गोष्ट

वहीत उतरवायला सुरुवात केली. मुली थोड्या मोठ्या झाल्यावर गोष्ट सांगणे कमी झाले पण तरीही त्या नवीन काय लिहिले, नसेल लिहिले तर काहीतरी लिही म्हणून मागे लागायच्या पण शिफ्टिंगच्या गडबडीत ती वही कुठे गेली तेच कळाले नाही(अजूनही ती वही सापडली नाही). परत आमच्या लेखणीला स्वल्पविराम मिळाला.

थँक्स टू सोशल मीडिया! इथे आल्यावर मात्र काही टास्क दरम्यान थोडेफार लिखाण करणे परत सुरू केले आणि सगळ्यांना ते आवडत होते...

माझ्या दोन मैत्रिणींनी  कार्यक्रमात सादरीकरण करण्यासाठी म्हणून माझ्याकडून लेखन करून मागितले.. जाम भारी वाटले राव मला!

असा माझा लेखनाचा प्रवास सुरु असतानाच www.esahity.com ही वेबसाईट एका मैत्रिणीने मला फॉरवर्ड केली. वेबसाईटवरचे एक पुस्तक वाचून झाल्यावर ते खूप आवडल्याने त्यावर कमेंट करताना अचानक मी एक कॉमेंट वाचली आणि ती वाचून समजले की  तुम्ही तुमचे लिखाण ह्या वेबसाईटसाठी  देऊ शकता. किंबहुना ही वेबसाईट नवीन लेखक/लेखिकांना प्रोत्साहन देण्यासाठीच काढली आहे. एकदम

मनात विचार आला की आपण आपले लिखाण देऊन बघुयात का? नाहीच छापले गेले तरी ठीक आहे पण जर त्यांना माझे लिखाण आवडले तर.... सोन्याहून पिवळे!

मग काय मी ई-मेल आयडी घेऊन त्यावर माझा एक लेख पाठवला आणि २ दिवसात श्री. सुनीळ सामंत ह्यांची प्रतिक्रिया आली,

*मा. प्राचीजी*

*लेख छान आहे. तुमची लिहिण्याची पद्धत आणि विषय दोन्हीही आकर्षक आहेत. वाचकांना गुंग करणारी आहेत.*

*असे किमान ६-८ लेख व बरेचसे फ़ोटो मिळाले तर एक छान पुस्तक होऊ शकेल.*

*सोबत एक नमूना पुस्तक जोडले आहे. असे एखादे पुस्तक आपले बनवूया.*

*सुनीळ सामंत*

*टीम ई साहित्य*

आज मै उपर आसमा नीचे...........तो ई-मेल वाचून माझी अशी गत झाली!

माझी अपेक्षा फक्त एक लेख छापावा ही होती पण श्री सामंत ह्यांनी पुस्तक बनवूयात म्हणून सांगितले... त्यानंतर मी त्यांना अनेकदा मेल करून खुपसाऱ्या छोट्या छोट्या शंका विचारल्या आणि त्यांनी दरवेळी न कंटाळता माझ्या सगळ्या शंकेचे निरसन

केले. खरेच सुनीळ सर मला इतके सहन केल्याबद्दल आणि मला प्रोत्साहन देऊन एक कथेच्याऐवजी पूर्ण पुस्तक लिहायला प्रेरणा दिल्याबद्दल तुमचे खूपखूप आभार!

मी पूर्वी लिहिलेल्या कथा थोड्या छोट्या होत्या मग  मी त्या कथा अजून थोडा मीठमसाला लावून मोठ्या करायच्या ठरवल्या आणि थोडेसे रंजक करण्यासाठी एखाददोन प्रसंग मनाचे पण टाकले!

ह्या कथासंग्रहाला प्रवासवर्णन म्हणू शकतो की नाही हे मला खरेच सांगता येणार नाही कारण मी  आमच्या केलेल्या ट्रिपमधल्या ज्या अविस्मरणीय चांगल्या/वाईट घटना घडल्या त्या लिहिल्या आहेत.

ह्या कथासंग्रहतील सगळे प्रसंग, कथा तुम्हाला नक्की आवडतील हीच अपेक्षा!

सुप्रिया

माझे हे पहिलेवहिले पुस्तक

माझें आईबाबा, हे, जान्हवी, आर्या, संगिता आणि

सागर

ह्यांना मी अर्पण करीत आहे

# प्रस्तावना

माझ्या आयुष्यात ज्या काही महत्वाच्या घटना घडल्या त्यामध्ये काहींनाकाही ड्रामा घडलाच. घरी मला सगळेजण मी खूप ड्रामेबाज आहे म्हणून चिडवतात! माझा स्वभाव आहेच थोडासा नखरेल. एकसुरी आयुष्यपण जगायला आवडत नाही मला. त्याचीच काळजी घेऊन देव आपले माझे आयुष्य अधूनमधून मनोरंजक करत असतो.

माझे मेमध्ये होणारे लग्न जुलैमध्ये झाले. मेमध्ये लग्न असल्याकारणाने आम्ही मधुचंद्रासाठी गुरुनाथ ट्रॅव्हल्सतर्फे मालदीवचे बुकिंग केले होते.



पण तेव्हा मालदीवमध्ये अतिवृष्टी होत असल्यामुळे आणि त्यावर्षी जोरदार पाऊस पडणार हा अंदाज वर्तवल्यामुळे आम्हाला ही ट्रिप रद्द करावी लागली. तुफान पावसात कुठे जावे हेपण समजत नव्हते. त्यांनी आम्हाला आत्ता तुम्ही कुलू, मनाली, सिमला करू शकता म्हणून सांगितले.  हे सगळे ठरवायला आम्ही दोघेच गेल्यामुळे, काही सुचत नसल्याने आणि त्यांना आपल्यापेक्षा जास्त माहिती असणार ह्या कल्पनेने त्यांनी जे सांगितले त्यावर विश्वास ठेवून आम्ही आमच्या हनिमून साठी कुलू, मनालीचे पॅकेज घेतले. तिथे लोकं आपल्याकडे बर्फ नसल्याने बर्फाचा आनंद घेण्यासाठी, त्यावर खेळायला  जातात पण आम्ही तिथे जाऊन आपल्याकडे चिखलपण नसतो ही समजूत करून घेऊन त्याचा आनंद घेतला. अरे हो! आमच्या हॉटेलमधून आम्हाला एका उंच डोंगराच्या टोकाला असणारा बर्फ बघायला मिळाला हेही काय कमी आहे का? आम्ही नवविवाहित असल्याने त्याचे एवढे दुःख झाले नाही हेही तितकेच खरे आहे. बाकीच्या बऱ्याच चांगल्या जागा, सुंदर मंदिरे, छान छान स्थळे आम्हाला बघायला मिळाली. पण जर ती ट्रिप साधीसरळ बाकीच्या जोडप्यांसारखी झाली असतीतर इतके लक्षात नसते राहिले ना म्हणून आमच्याबरोबर थोडेफार अविस्मरणीय प्रसंग घडले आणि आमची ही सहल कायमची लक्षात राहिली. खूप छान, थोड्या दुःखद, दुःखद म्हणण्यापेक्षा

अनाकलनीय प्रसंगाने चकित करून गेली. ह्याचे सविस्तर वर्णन मी माझ्या हनिमून ह्या कथेत केले आहे.

आम्हाला दोघांना फिरण्याची, नाटक, सिनेमे पहाण्याची खूप आवड. त्यामुळे खूप मज्जा करायचो. अगदी जान्हवी झाल्यावर सुद्धा बरेचदा तिला घेऊन, अगदीच घेऊन जाऊ शकत नसलो तर आईकडे सोडून, कित्येकदा आईला पण बरोबर घेऊन तो काळ अगदी मनापासून उपभोगला. प्रत्येक लग्नाच्या वाढदिवसाला १ दिवस का होईना पण कुठेतरी बाहेर जायचे हेपण ठरवून टाकले, आम्ही केलेला हा नियम भारतात असेपर्यंत तो काटेकोरपणे पाळला. असेच एका लग्नाच्या वाढदिवसाला महाबळेश्वरला गेल्यावर घडलेला छोटा किस्सा मी जरा तिखटमीठ लावून लिहिला आहे बरं का!



काही वर्षांनी नवऱ्याला वेस्ट आफ्रिकामध्ये जॉब मिळाल्याने आम्हाला घानाला शिफ्ट व्हावे लागले. हे अगोदर गेले.



तीन-साडेतीन महिन्यांनी माझ्या दोन मुली जान्हवी व आर्या ह्यांच्याबरोबर पहिल्यांदा विमानप्रवास करून गेले. एकतर पहिल्यांदाच विमानप्रवास करणार असल्यामुळे त्याचे टेन्शन आणि त्यात २ लहान मुलींना घेऊन जायचे म्हणूनतर आणखीनच चिंता वाढली होती पण वर म्हंटल्याप्रमाणे मी मुलींना घेऊन प्रवास न करता मुलींबरोबर प्रवास केला हे म्हणण्याइतके बळ आणि मदत माझ्या मोठ्या लेकीने जान्हवीने मला केली. त्याबद्दलचा एक  किस्सा मी ह्या कथा मालिकेमध्ये लिहिला आहे. घानामध्ये असताना आम्ही खरे कौटुंबिक आयुष्य जगलो. मी इथे आल्यानंतर आलेली नोकरीची ऑफर सोडून मुलींकडे लक्ष देण्याचे ठरवल्यामुळे मुलींकडून खूप काही शिकायला मिळाले. हेपण संध्याकाळी लवकर परत येत असल्याने रोज वेगवेगळे गेम्स खेळून धमाल करायचो. तिथे गेल्यागेल्या आमचा मित्रमैत्रिणीचा खूप छान ग्रुप झाला होता.आमच्या पूर्ण ग्रुपने तिकडे गेल्यानंतर लगेच येणाऱ्या ख्रिसमस हॉलिडेमध्ये झुलता पूल आणि आजूबाजूचा परिसर बघायला म्हणून तिथे ट्रिप काढली.  त्यावेळी आर्या सव्वा वर्षांची

होती. पुलावरून जायच्या अगोदर तो पार करणे इतके अवघड वाटत नसल्याने आर्याला घेऊन मी सहज पूल पार करेन ह्या आत्मविश्वासाने चालायला सुरुवात केली पण थोड्याच वेळात अतिआत्मविश्वास घातक ठरू शकतो का असे वाटू लागले होते, त्याचे सविस्तर वर्णन मी ह्या कथामालिकेत केले आहे.



तिथून मग आम्ही युगांडाला गेलो.



तिथेपण आम्ही भरपूर हिंडलो, मज्जा केली, मित्रमैत्रिणी खूप चांगले असल्याने तर त्यात अजूनच भर पडली. माझी आई युगांडाला आली होती तेव्हा आम्ही जंगल सफारी केली. ईस्ट आफ्रिकामधली जंगल सफारी खूप प्रसिद्ध

आहे. केनिया आणि टांझानिया तर ह्यासाठी सगळयात जास्त फेमस आहे. जे अगोदर जाऊन आले होते त्यांनी आम्हाला खूप वेगवेगळया प्रकारचे अनुभव सांगितले असल्याने आणि आम्ही पहिल्यांदांच  जंगल सफारी करणार असल्याने  खूपच  उत्कंठता होती. सफारीला जायचे ठरल्यानंतर आम्ही सगळेजण ट्रिपबद्दल ठरवायला एकत्र भेटलो होतो, तेव्हा एका कुटुंबाने आम्हा सर्वांना बोलता बोलता  सांगितले की आत्तापर्यंत त्यांनी कमीतकमी ७-८ वेळा तरी वेगवेगळया ठिकाणची सफारी केली आहे पण जितक्यावेळेला ते सफारीसाठी गेले आहेत तेव्हा त्यांना नेहमी काहीतरी वाईट अनुभव आलेला आहे. आमची खूपच घट्ट मैत्री असल्याने आम्ही सगळयांनी तेव्हा त्यांची खूप चेष्टा उडवली आणि अगोदर सांगितले असतेतर आम्ही तुमच्याबरोबर आलोच नसतो हेपण म्हणालो. पण कोणीही ह्या गोष्टीला इतके गंभीरपणे घेतले नाही,  खरेच आम्ही थोड्या थरारक अनुभवातून गेलो पण आमचे नशीब चांगले किंवा देव आमच्याबरोबर होता त्यामुळे आम्हाला कुठलाही वाईट अनुभव आला नाही आणि सहीसलामत घरी पोहचलो. तो न विसरणारा अनुभवपण मी इथे लिहिला आहे.



तिकडून आम्ही भारतात सुट्टीसाठी जाताना मध्ये दुबई बघण्यासाठी म्हणून मुक्काम केला. आम्ही ज्या एजंटकडून ट्रिप बुक केली होती त्याने आमच्याबरोबर अजून एक जोडप्याचे बुकिंग केले होते. एअरपोर्टवरच आम्ही एकमेकांना भेटलो पण आमचे इतके छान जमले की आम्ही सगळे एकमेकांना गेल्या जन्मापासूनच ओळखत होतो की काय असे वाटू लागले होते. आमच्या रुम्सपण अगदी बाजूबाजूलाच होत्या शिवाय दोन्ही कुटुंबासाठी एकच prado दिली होती त्यामुळे आम्ही सगळीकडे एकत्रच फिरत होतो. रोज फिरूनफिरून खूप दमायचो पण तरीही रात्री खरेदी करण्यासाठी मात्र न चुकता बाहेर पडायचो. जसे काही भारतात किंवा युगांडामध्ये काहीच मिळत नाही अश्याप्रकारे आमची खरेदी चालली होती.



हॉटेलमध्ये परतताना बॅग्स उचलवत नसायच्या इतकी खरेदी चालायची. एवढे करूनही आखा एक दिवस आम्ही फक्त आणि फक्त खरेदीसाठी ठेवला होता. त्यादिवशी भरपूर चॉकलेट्स आणि सोने खरेदी पण केली. सोबत असलेल्या दादा व वहिनींनी त्यांच्या दोन मुलांसाठी(भारतात पुढच्या शिक्षणासाठी रहात होते) आमच्यापेक्षा तिप्पट खरेदी नक्कीच केली असणार! जगातले सगळ्यात फास्टेस्ट रोलरकोस्टरवरतर बसलोच पण तिथे रेतीचे जे डोंगर बनले आहेत (तिथे जाण्यासाठी स्पेशल ट्रेंड चालक आणि स्पेशल गाडी पण लागते) त्यावरून जाताना रोलरकोस्टर पेक्षा जास्त थरारक अनुभव आला. एकदम वरून खाली खालून वर शिवाय वाळू असल्याने बेसपण पक्का नव्हता त्यामुळे एक बाजूला कधी कधी गाडी एकदम खाली आणि एक बाजूने एकदम वर अशीपण व्हायची. कसली सॉलिड मज्जा आली माहितीये..




तिथल्या एका विशिष्ट ठिकाणी तुम्हाला थोडावेळ थांबतापण येते. तिथे थांबून आम्हाला खूप छान सूर्यास्तपण बघायला मिळाला आणि जो थोडाफार  शीण आला होता तो सगळा निघून गेला.



इथे आम्ही ऍडव्हेंचर पार्कला गेल्यावर जी मज्जा अनुभवली ती नक्कीच वाचा आणि तुम्हाला कशी वाटली तेपण नक्की सांगाल!

आमच्या  केनियन सफारी करण्याचे खूप मनात होते पण काहीकेल्या  योग येत नव्हता. शेवटी देवाने आम्हाला केनियामध्येच शिफ्ट केले! तरीही आमचा योग काही येईना. अगदी इथून ऑस्ट्रेलियाला जाऊन आलो पण केनिया फिरणे काही जमत नव्हते.

इथे जुलै/ऑगस्ट मध्ये वन्यपशु नदी पार करतात ते बघणे हा एक नेत्रदीपक सोहळा असतो. ते बघण्यासाठी आणि बाकीची पण प्रेक्षणीय स्थळे व रवांडाला मॉउंटन गोरिला पार्कमध्ये गोरीलाज आहेत जे खूप उंचावर राहतात आणि दुर्मिळ सुद्धा आहेत त्यांना बघण्यासाठी म्हणून माझी मावसजाऊ मेघना केनियाला आली तेव्हा तिच्याबरोबर आम्ही आमची इच्छा पूर्ण केली.



सगळे पशुपक्षी बघायलातर मिळालेच, त्याबरोबर खूप कमी दिसणारा, दुर्मिळ असणारा गेंडा व बिबट्या पण दिसला. नशीब आमचे एकदम जोरावर होते त्यामुळे रिव्हरक्रॉस करणारी खूप मोठी वन्यपशूंची झुंडच्या झुंड तेसुद्धा अगदी सुर्यास्ताच्यावेळी बघायला मिळाली. काय देखावा होता आहा! सगळ्यांना शिकार बघायला खूप आवडते, तुम्ही जर भाग्यवान असाल तरच तुम्हाला शिकार बघायला मिळते असे म्हणतात. मी सोडून सगळेजण शिकार बघायला मिळावी म्हणून प्रार्थना करत होते पण मीमात्र एक प्राणी

दुसऱ्याचा लचका तोडतो ते काय बघायचे असे सारखे म्हणत होते. त्या ट्रिपमध्ये एक शिकार सोडली तर सगळेच्या सगळे वाईल्डलाईफ आम्हाला बघायला मिळाले. आम्ही राहिलेले हॉटेल खूपच छान होते आणि ते चहूबाजुंनी जंगलाने वेढलेले होते.

रात्री 12 नंतर तिथे लाईट बंद करतात त्यामुळे सगळीकडे काळोख असतो आणि त्यात रात्री खूप सारे वेगवेगळे आवाजपण ऐकू येतात. अगदी आपल्या खोलीच्या बाहेर पण असू शकतात हो! विनोद सोडून. जंगलातच हॉटेल असल्याने खूप जवळून आवाज ऐकू येतात. त्यात बाकीचे सगळे गाढ झोपले असतील आणि तुम्ही एकटेच जागे असालतर मात्र तुमची व्यवस्थित फाटतेच! आम्ही शाकाहारी असल्याने जेवणाचे थोडेसे हाल झाले. इथे गुजराथी खूप संख्येने असल्याने आणि त्यातले बरेचसे कांदालसूणपण खात नसल्यामुळे शाकाहारी पदार्थ खुपसारे असतात पण आम्हाला म्हणावी इतकी चव आवडली नाही. आम्ही निघताना बाकीचे सगळे छान असल्यामुळे त्याचे कौतुक केले पण "शाकाहारी मेनू थोडा अजून छान करता आला तर अजून मजा आली असती" हा रिमार्क नंतर जे येतील त्यांना चविष्ट खायला मिळेल ह्या आशेने लिहिला.

आत्ता ह्या कोरोनाच्या काळात बाहेरचे प्रवासी कोणीच येत नसल्यामुळे सगळया हॉटेलचे रेट जवळपास निम्म्याने खाली आले होते. त्यामुळे ह्या संधीचा लाभ जवळपास सगळया केनियामध्ये राहणाऱ्या नागरिकांनी उठवला, आम्ही काही इतरांहून वेगळे नसल्याने ह्या संधीचा फायदा थोडीच सोडणार होतो! आमचे खूप जवळचे घनिष्ट कौटुंबिक मित्र देशपांडे ह्यांनी आम्हाला जायचे का हे विचारल्यावर आम्ही लगेच त्या दिशेने प्रयाण केले! सगळयांना ह्यावेळीपण शिकार बघायची ईच्छा होती आणि मला अगोदरच आमच्या इकडच्यानी समजावून सांगितले होते की हे निसर्गचक्र आहे, ते जर सुरू नाही राहिले तर............... शेवटी इतके सगळे सांगून त्यात काही चूक नाही हे माझ्या गळी उतरवायला यशस्वी ठरले.

मीपण त्यांच्याबरोबर शिकार बघायला मिळावी ह्या इच्छेत होकार मिळवला आणि खरेच आम्ही घेतलेल्या ह्या संधीचे सोने झाले!आमची ही ट्रिप कशी सुफल आणि संपूर्ण झाली हे नक्की वाचा बरं का!

प्रवासकथा क्रम

**हनीमून**

**महाबळेश्वर**

**पहिला विमान प्रवास**

**रोमांचक प्रवास**

**समोर दिसलेला मृत्यू**

**दुबई ट्रिप**

**केनिया मारासफारी**

# हनिमून




लग्न झाल्यावर एक रीत/पद्धत असल्याने आम्हीपण हनिमून साठी दिल्ली, कुलू, मनाली, सिमला ह्याठिकाणी गेलो होतो.

पुण्याहून मुंबई व तिथून राजधानी एक्सप्रेसने दिल्ली आणि तिथूनपुढे आम्ही सगळीकडे कारने फिरलो. तसे आम्ही आजपर्यंत ट्रेनने भरपूर प्रवास केला पण मी राजधानी एक्सप्रेसमध्ये पहिल्यांदाच बसले होते. राजधानी एक्सप्रेस खूपच छान होती. ऐसपैस, एकदम स्वच्छ! आम्ही आमच्या सीटवर बसल्यावर लगेच पाणी आणून दिले, नंतर खायलापण आणून दिले. ह्यांनी मार्केटिंग मध्ये असल्यामुळे खूपदा अश्या ट्रेनने प्रवास केला होता पण मी हे सगळे पहिल्यांदाच अनुभवत होते! एकदम भारी वाटले. दिल्ली कधी आले कळलेपण नाही!

दिल्लीला स्टेशनवर उतरल्यावर आमच्या नावाचे फलक घेऊन आमच्या कारचा चालक आमची वाट बघत उभाच होता. गाडीत पण पाण्याची बाटली होती. ३ किंवा ४ स्टार हॉटेल सगळीकडे बुक केले होते. त्यामुळे हॉटेलपण एकदम भारी होते.



लग्नाअगोदर दर २ वर्षांनी आम्ही ट्रिप काढायचो पण नेहमी 2nd क्लासने प्रवास केला आणि हॉटेल चांगले असायचे पण ३ किंवा ४ स्टार मध्ये कधीच राहिलो नाही.. त्यामुळे ह्या सगळ्याचे खूप कुतूहल आणि नवऱ्याबद्दल जाज्वल्य अभिमान जागा झाला होता..

मस्त आराम करून संध्याकाळी तिथली काही ठिकाणे फिरलो. असे २ दिवस दिल्ली दर्शन केले. लग्नाअगोदर आम्ही दोघांनीही दिल्ली बघितल्यामुळे काही मोजकीच ठिकाणे फिरलो.



नंतर मग आमचा प्रवास सुरु झाला! १० रात्र आणि ११ दिवस असा प्रवास असल्यामुळे आम्ही वाटेतली सगळीच ठिकाणे बघत जाणार होतो. मला गाडीमध्ये जास्त बसल्यावर थोडे गरगरल्यासारखे होई आणि झोप अत्यंत प्रिय असल्याने माझा गाडीतला बराचसा प्रवास झोपण्यातच गेला. त्यावरून मला "बाहेरचे इतके छान सृष्टीसौंदर्य आणि नवीनच लग्न झालेले असून नवऱ्याबरोबर गप्पा मारण्यापेक्षा आमची बायको प्रवासात पूर्णवेळ झोपून होती आणि मग नाईलाजाने मी चालकाबरोबर सृष्टीसौंदर्य

बघत व गप्पा मारत प्रवास पूर्ण केला" असे आजही ऐकून घ्यावे लागते.



ह्या प्रवासादरम्यान घडलेले २-३ प्रसंग मात्र कायमचे मनावर कोरले गेले.

दिल्लीहून 6-6.30 तास प्रवास करून हिमायलायच्या कुशीत वसलेल्या परवानो ह्या गावात येऊन आम्ही थोडावेळ थांबून फ्रेश झालो. तिथेच एका उंच डोंगररांगेत खूप सुंदर व नयनरम्य असे ट्रिम्बल ट्रेल म्हणून एक रिसॉर्ट आहे. तिथे जाण्यायेण्याचा एकच स्रोत आणि तो म्हणजे रोपवे. हा साधारण 2 km चा वनवे रोपवे आहे आणि आपण तो 8 मिनिटात पार करतो.



इतक्या उंचावरून जाताना सुरुवातीला खरेच पोटात गोळा येतो. खाली पूर्ण जंगल आहे, भरपूर झाडी! सुरुवातीची १ मिनिटाची वाटलेली भीती गेल्यानंतर ते सौंदर्य बघून नजर हटत नव्हती. इतक्या वर्षांनीसुद्धा आत्ता लिहिताना ते सृष्टीसौंदर्य नजरेसमोरून तरळून गेले. डोंगरावरील परिसरसुद्धा खूपच छान आहे. तिथे वर बरेच हॉटेल्स व रेस्टॉरंट आहेत.खरेच त्या बाजूला फिरायला गेलात तर आवर्जून ह्या जागेला भेट द्या!



कुफ्री ह्या गावात महासू पीक म्हणून कुफ्रीमधली सगळ्यात उंच जागा आहे, तिथे तुम्हाला घोड्यावर बसूनच जावे लागते. आम्ही दोघेजण दोन घोड्यांवर बसून चढ चढायला सुरुवात केली. नुकताच पाऊस पडून गेल्यामुळे अगोदरच खराब असलेली पायवाट अजूनच खराब झाली होती आणि त्यात एका बाजूला खोल दरी होती. माझा घोडा दरीच्या बाजूला होता. घोड्यांचे मालक त्यांना पकडून चालत होते, आम्ही त्यांना, "इतक्या खराब रस्त्यावर घोडे नीट जातील ना!" हे विचारल्यावर त्यांनी,"हा घोड्याचा नेहमीचा रस्ता आहे, ते डोळे बंद करून पण जाऊ शकतात" असे उत्तर दिल्यावर आम्ही त्यांच्यावर आमचा सगळा भार टाकून निर्धास्त झालो.



दोन्ही घोडे थोडेफार मागेपुढे असे चालले होते त्यामुळे आम्ही दोघे मस्त गप्पा मारत चाललो होतो. अचानक मी ज्या घोड्यावर बसले होते त्याला एकदम काय झाले काय माहीत, त्याचा एकदम तोल गेला आणि एक पाय दरीत गेला, आम्ही खाली पडणार हे मला कळल्यावर मी त्याची दोरी घट्ट पकडली, तो अजूनच बिथरला आणि दरीत पडलेला पुढचा एक पाय आणि पुढचाच दुसरा पाय असे दोन्हीही पाय एकदम वर केले! नशीब त्या घोडा पकडलेल्या माणसाने त्याला पटकन जोरात आत ओढून घेतले. जवळजवळ आम्ही आतल्या बाजूला खालीच पडणार होतो पण दुसरा घोडा पकडलेला माणूस चपळाईने सरसावला आणि दोघांनी त्या घोड्याला पकडले.. हे सगळे खरेतर अगदी १ मिनिटात घडले होते पण तो १ मिनिट आमच्यासाठी जीवनमरणाचा खेळ झाला होता. खरेच त्या दिवशी मरण काय असते ह्याचा थोडासा का होईना पण अनुभव आला! आलेले संकट देवाच्या कृपेने थोडक्यात निभावले.. हा सगळा प्रकार झाल्यानंतर ह्यांनी वर न जाता आम्हाला परत पायथ्याशी सोडायला सांगितले..

बाकी कुठेही न जाता आम्ही थेट हॉटेलवरच आलो.. खुपवेळ हे काहीच बोलत नव्हते, मी शेवटी, " जे झाले ते झाले, मी मेलेतर

नाही ना", असे म्हणाले तेव्हा डोळयात पाणी येऊन मला जवळ घेऊन  म्हणाले,"परत असे कधीच बोलू नकोस". थोड्यावेळाने आम्ही नॉर्मल/फ्रेश  होण्यासाठी म्हणून हॉटेलमध्येच फिरायचे ठरवले. हॉटेल खूप मोठे आणि छान असल्यामुळे तिथे आमचा वेळ कसा गेला ते कळालेच नाही.  तिथे असलेले टेनिस, डार्ट आणि अजूनही खूप वेगवेगळे गेम्स खेळलो, भरपूर हिंडलो, सगळयांशी भरपूर गप्पा मारल्या. अशारितीने 'शेवट छान तर सगळे छान' ह्या उक्तीप्रमाणे त्या दिवसाचा शेवट खूप छान झाला.

सिमल्याहून हॉटेलमधून निघताना सगळ्या स्टाफला खूप वाईट वाटत होते. खूपजणांनी सांगितले की अजूनपर्यंत आम्हाला कोणीच अश्या मित्रत्वाच्या नात्याने वागवले नाही. आम्ही त्या सगळयांना खूप छान टीप दिली त्यामुळेतर खूपच आनंदित झाले. त्यांनी आम्हा दोघांना खूप छान पुष्पगुच्छ दिले व छोटे गिफ्ट्सपण खूप प्रेमाने दिले..

आता आम्ही सिमल्याहून कुलूला जायला निघालो. मी गाडीत झोपत असल्यामुळे हे चालकाबरोबर पुढेच बसायचे, त्यामुळे ह्यांची त्याच्याशी छान गट्टी जमली होती! प्रवासात

दोघेजण मस्त गप्पा मारायचे, तो तिथला लोकल असल्यामुळे खूप सारी माहिती पण देत होता. ह्यांना मुळातच भूगोल खूप आवडत असल्यामुळे आणि सामान्य ज्ञान पण खूप चांगले असल्यामुळे सगळी माहिती लक्षपूर्वक ऐकून खूप सारे प्रश्नपण विचारत होते! दोघांचे खूपच छान गुळपीठ जमले होते..

सिमल्याहून कुलूला जाताना मंडी नॅशनल हायवे पार करून जावे लागते. आत्ताचे माहीत नाही पण त्यावेळी एकपदरीच रस्ता होता. खूपच छोटा रस्ता होता आणि वळणेपण भरपूर, काहीकाही ठिकाणी तर ब्लाइंड टर्न होते. ते कमी की काय म्हणून एका बाजूला खोल मोठी दरी व बियास नदी आणि एका बाजूला उंचच्या उंच पहाड असा रस्ता होता. तुरळक रहदारी आणि चालकाचा नेहमीचा रस्ता असल्याने तो खूप सफाईने गाडी चालवत होता. बारीक पावसाची रिपरीप पण चालू होती. ते गाडीत लावलेले मंद सुमुधुर संगीत, अप्रतिम सृष्टीसौंदर्य आणि त्यात बारीक पडणाऱ्या पावसाचा आवाज आणि त्याचा मातीतून येणार सुगंध.. आहा! खूप सुंदर नजारा होता. नेहमी गाडीत झोपणारी मीपण उठून बसून सगळे सौंदर्य डोळ्यात साठवून घेत होते. इतके छान, सुंदर, मनमोहक

सौंदर्य आणि वातावरण होते की आम्ही कोणीही एकमेकांशी न बोलता विध्यात्याशी जोडले गेलो होतो! आणि अचानक......

आमच्या गाडीच्यासमोर खूप मोठी दरड कोसळली.



आमच्यात आणि त्या कोसळलेल्या दरडीत फारफारतर २-३ इंचाचे अंतर असेल. गाडीच्या काचेला दरड चाटून खाली पडली होती त्यामुळे काचेला मोठा तडा गेला पण कसे काय माहीत नाही पण इतकी मोठी दरड असूनसुद्धा काच तुटली नाही. आमच्यासमोरच्या दोन्ही गाड्या दरडीखाली सापडल्या होत्या.

काय चालले आहे काही कळतच नव्हते.. आम्ही तिघेही सुन्न झालो होतो! सगळी ट्रॅफिक जाम झाली होती...



बरेच तास तिथेच उभे राहिल्यानंतर मग आम्ही परत गाडी मागे वळवून मंडी ह्या गावात आलो. पुढे जायला रस्ता नसल्याने सगळेजण इथेच राहणार होते त्यामुळे हॉटेलपण पॅक होते. त्यातल्या त्यात बरे हॉटेल मिळेपर्यंत रात्र झाली होती. भूकतर उडूनच गेली होती पण तरीही थोडेफार खाऊन आम्ही लगेच आमच्या खोलीत गेलो. प्रचंड ताण आणि खूप वेळ ट्राफिक मध्ये अडकून राहिल्यामुळे खूपच दमलो होतो. २ मिनिटात झोपी गेलो ते सरळ सकाळी ५ वाजता तिथला मुलगा उठवायला आल्यामुळे जाग आली. लगेच आवरून फक्त चहा पिऊन गाडीजवळ आल्यावर

चालक म्हणाला,"काल रात्रीच कोसळलेली दरड काढल्यामुळे रस्ता clear झाला आहे आणि काल इथे अडकलेले सगळेजण आणि आजचे जाणारे असे खुपजण असतील, त्यामुळे रहदारी खूपच वाढेल. आपण लवकर निघू म्हणजे मग आपण ट्रॅफिक मध्ये न अडकता लवकर पोहोचू". आम्ही सकाळी ६ वाजताच तिथून निघालो. आमच्यासारखा विचार करणारे बरेचजण होते. तरीही म्हणावी इतकी रहदारी नसल्याने तसे आम्हाला फार अडकून बसावे लागले नाही. नंतर आम्हाला कळले की ७ नंतर जे कोणी निघाले त्यांना ट्रॅफिक जॅम झाल्यामुळे खूपच वेळ अडकून राहावे लागले.

आमची सिमला ट्रिप खूपच छान झाली. आईने आमच्याबरोबर आमचे न ऐकता,"राहू दे जवळ. नाहीच खाल्ला गेलातर परत येताना कोणालातरी देऊन टाका सगळा फराळ" असे म्हणून खूप सारा फराळ दिला होता. रोज हॉटेलचे खाऊन कंटाळा आला होता आणि बरोबर भरपूर फराळ असल्याने आम्ही एक दिवस संध्याकाळी तिथल्या भाजीमंडईत जाऊन कांदे, टोमॅटो, मिरची, कोथिंबीर घेऊन आलो. हॉटेल मधून सूरी घेऊन सगळे मस्त बारीक चिरून चिवड्यात घालून दडपे पोहे करून खाल्ल्यावर बरे

वाटले! आणि त्यादिवशीच ठरवले की आता रोज थोडा थोडा फराळ खायचा..

सिमल्याहून कुलूला गेलो, तिथून मनालीला. मनाली मध्ये आम्ही "Apple" म्हणून असलेल्या रीसॉर्टचे मध्ये उतरलो होतो.




तिथला बराचसा स्टाफ हा मराठी होता आणि त्यात एकजण आमच्यासारखेच नवीनच लग्न झालेले जोडपे होते. आम्ही सगळ्यांशीच बोलून, हसतखेळत राहत असल्यामुळे आमची त्यांच्याबरोबर एकाच दिवसात गट्टी जमली. आम्ही सगळ्यांनी एकत्र खूप मज्जा केली, बऱ्याच ठिकाणी आम्ही एकत्र हिंडलो, आमच्यासाठी त्यांनी हॉटेलचे खाऊन कंटाळा आल्यामुळे बरेचदा

महाराष्ट्रीयन घरगुती स्वयंपाक केला होता! मला मुगाचा हलवा खूप आवडत नाही, मी खातच नाही पण त्या सगळयांच्या आग्रहाखातर  १ चमचा खाल्ला. इतका चविष्ट झाला होता की अर्धाच्यावर मीच तो हलवा संपवला. तसा हलवा मी अजूनपर्यंत खाल्ला नाहीये! त्यांनी आम्हाला एका दिवसासाठी रूम upgrade करून हनिमून स्वीट पण दिला. आईशपथ! एकदम भारी होती रूम आणि त्यातल्या सगळया अमेनिटीज पण..  सगळे जवळपास समवयस्क असल्याने खूप दंगा केला. पत्ते, बॅडमिंटन, कॅरम, दमशराज, गाण्याच्या भेंड्या असे बरेच खेळ खेळलो. त्यांना आम्ही ह्या जन्मात तर कधीच विसरू शकणार नाही.

दोन वाईट प्रसंग झाल्यावर मात्र आता तिसरा प्रसंग ओढवू नये म्हणून हे खूपच काळजी घेत होते. चालकाला पण सारखे सांगत होते, "काळजी घे, गाडी हळू चालव".

प्रवासादरम्यान खूप चांगला चालक आणि सगळी माणसे पण खूप चांगली भेटली होती आम्हाला! अक्षरशः परत दिल्ली रेल्वे स्टेशनवर सोडताना चालकाच्या डोळयात पाणी तरळले होते.

निघताना त्याने आम्हाला दोघांना आठवणीत राहील असे खूप छान गिफ्ट दिले.

सिमला, कुलू, मनाली, अंबाला, पालमपूर, कुरुक्षेत्र, दिल्ली अशी बरीच ठिकाणे आम्ही पाहीली. हे दोन प्रसंग सोडले तर आमची ट्रिप खूपच छान झाली. हिमाचल प्रदेश/ काश्मीर ही खरेच देवाची भूमी असणार. खूप छान वातावरण, निसर्गाची पूर्ण कृपा आहे ह्या भागावर इतकी सुंदर सृष्टी, निसर्गरम्य परिसर, तिथली जनता पण खूपच साधी आणि सगळे स्वभावानेपण खूप चांगले आहेत! तसाही प्रत्येकाला हनिमून हा कायम लक्षात राहतोच पण ह्या २ वाईट प्रसंगाने आणि खूप साऱ्या चांगल्या प्रसंगाने आमची ही ट्रिप अविस्मरणीय झाली!

# महाबळेश्वर

प्रत्येक वर्षी लग्नाच्या वाढदिवसाला आम्ही कुठेतरी फिरायला जायचो. जान्हवी २ वर्षाची असताना आम्ही लग्नाचा वाढदिवस साजरा करण्यासाठी महाबळेश्वरला गेलो होतो.



आमची जान्हवी आणि आज्जीची मनाली तशी एकदम शांत आणि शहाणी. तिचा जन्म होताना मला अगदी ५ मिनिटच त्रास झाला आणि आमच्या गोड परीने जन्म घेतला! मला मुलगीच हवी होती आणि नवऱ्याला काहीही चालणार होते. शिवाय कुठलाही

त्रास न होता बाळंतपण झाल्यामुळेतर आमच्या आनंदाला पारावर उरला नव्हता. जन्म झाल्यानंतरसुद्धा तिने कधीही त्रास दिला नाही.

आम्ही तिघे महाबळेश्वरला गेलो. खूप खुश होतो आम्ही! सकाळी लवकर निघाल्याने महाबळेश्वरला लवकर पोहचलो. हॉटेलमध्ये जाऊन फ्रेश होऊन पोटभर जेवून तृप्ततेचा ढेकर देऊन खरेतर एक ताणून द्यायचा बेत होता पण आमच्या मनालीला बाहेर फिरायला जायचे होते! "इथे मज्जा करायला आलो आहे मग का झोपायचे?",असा प्रश्न विचारल्यावर तिची समजूत घालायचे थांबवून आम्ही दोघे गुपचूप तयार झालो आणि बाहेर हिंडायला बाहेर पडलो. पण एकदा बाहेर पडल्यावर फ्रेश वाटले.

वेण्णा लेकला गेलो, तिथे मस्त बोट रायडींग करून नंतर तिला घोड्यावर बसवले. सुरुवातीला खूप घाबरली, थोडेसे डोळ्यातून पाणीपण आले. तरीही मी तिला उतरवून खाली घेणार नाही हे लक्षात आल्यावर गाल फुगवून घोड्यावर बसून राहिली पण थोड्यावेळाने तिला एकदम छान वाटले. राऊंड संपल्यावर खाली उतरायला पण नाही म्हणाली आणि अजून एक फेरी करून आली. तिच्या चेहऱ्यावरचा आनंद बघून आम्हा दोघांना आपली झोप

मोडली म्हणून जी नाराजी आली होती ती एका झटक्यात दूर होऊन एकदम ताजेतवाने झालो.



तिथून एकदोन पॉईंट्स बघून आम्ही सनसेट बघायला गेलो. सीझन नसल्यामुळे अगदी तुरळक गर्दी होती. आम्ही पोहचलो तेव्हा अजून सनसेट व्हायचा होता म्हणून तिथे एकेठिकाणी बसलो होतो. आमच्याजवळ अजून एक आज्जीआजोबा बसले होते, ते जान्हवीकडे बघत होते तर आमची मनाली तिरक्या नजरेने त्यांच्याकडे बघायची आणि ते बघून हसले कि परत लाजायची. त्यांनी तिला जवळ बोलावले पण विचारल्याशिवाय कोणाकडेही जायचे नाही आणि काही घ्यायचे नाही ही सक्त ताकत असल्याने

तिने आमच्याकडून पडत्या फळाची आज्ञा घेऊन लगेच त्यांच्याकडे गेली. आज्जीआजोबांना लहान मुलं खूप आवडत असावीत कारण ते तिच्याबरोबर तिथे पळापळी पण खेळले. बोलता बोलता हेपण कळाले की आम्ही एकाच हॉटेल मध्ये उतरलो आहोत. मग काय! आम्ही सगळेच एकदम खुश झालो आणि सूर्यास्त बघून एकत्रच हॉटेलवर गेलो.



हॉटेलवर येऊन फ्रेश होऊन १५ मिनिटांनी बाहेर गार्डन मध्ये भेटायचे ठरले.  ह्यावेळेस मात्र जान्हवीने त्यांच्याबरोबर त्यांच्या रूममध्ये न जाता आमच्याबरोबर येणाच्या निर्णयाने का माहित नाही पण मला  थोडेसे हुश्श झाले! आम्ही  १५ मिनिटांनी तिथे गेलो तर आज्जीआजोबा आमची वाटच बघत होते. ते दोघेजण जान्हवीबरोबर खेळायला लागले. आम्ही दोघेजण तिथेच बसून गप्पा मारत होतो.



खेळताखेळता तिघेजण आमच्यापासून दूर गेले. आज्जीआजोबा दोघेही चांगले असल्याने ते जान्हवीकडे नीट लक्ष देतील म्हणून आम्ही एकदम निर्धास्त होतो. आम्ही दोघेजण तिथेच गप्पा मारण्यात गुंगून गेलो होतो. साधारण ५-१०  मिनिटांनी मी सहज इकडेतिकडे बघितले तर हे तिघेही कुठेच दिसत नव्हते. ह्यांना सांगितल्यावर म्हणाले,"असतील इथेच कुठेतरी, हॉटेल सोडूनतर जाणार नाहीत ना, उगाचच काळजी करतेस!" अजून ५ मिनिट शांत बसल्यावर मात्र माझा जीव खालीवर होऊ लागला. हे वैतागून उठले आणि आम्ही तिघांना शोधत निघालो पण ते कुठेच दिसेनात. हॉटेलमध्ये जाऊन स्टाफला विचारल्यावर त्यांनीपण ‘आम्ही त्यांना कुठेच बघितले नाही म्हणून सांगितले’.  आता मात्र काळजीने जीव घाबराघुबरा झाला होता. तिथे आम्हाला शोधायला मदत करण्याऐवजी दोघातिघांनी आम्हालाच नावे ठेवायला सुरुवात केली. '२ तासाच्या ओळखीवर असे स्वतःच्या मुलीला

कोणी एकटे सोडते का? दोघांनाच इतका वेळ घालवायचा होता तर कशाला लेकीला घेऊन आलात? सोडायचे होते शेजाऱ्यांकडे आणि यायचे होते'. एकतर जान्हवी कुठे आहे ते कळत नसल्यामुळे जीव जातो की काय असे वाटत असताना लोकांनी आम्हालाच नावे ठेवायला सुरुवात केल्यामुळे तर आणखीनच टेंशन आले. मॅनेजरने तिथे असलेल्या सगळ्या स्टाफला कामाला लावले आणि तो आमच्याबरोबर गेटवर आला, तिथे असलेल्या रखवालदाराला त्यांनी कोणा आजीआजोबांना लहान मुलीबरोबर बाहेर जाताना बघितले का म्हणून विचारले? तर त्याने सांगितले की,“ आत्ताच ड्युटी चेंज झाली  आणि मी  कामावर आलो आहे त्यामुळे मला काही कल्पना नाही”. आता मात्र वेगवेगळे विचार मनात यायला लागले. पोलिसांकडे जाऊयात म्हणून मी मागे लागले. पण हॉटेल खूप मोठे असल्याने अजून थोडे शोधून मग ठरवूयात असे ह्यांचे व मॅनेजरचे बोलणे झाल्यावर आम्ही परत रिसेप्शनवर आलो.  सगळा स्टाफ पूर्ण हॉटेल शोधून आला होता पण हे तिघे कुठेच नव्हते. आम्ही सगळे सुन्न झालो होतो.



आता पोलिसांना फोन करावा म्हणून मॅनेजरने फोन उचलला तोपर्यंत मी त्या तिघांना  एका स्टाफ बरोबर रिसेप्शनकडे चालत येताना बघितले. काही न सुचून मी धावत त्यांच्याकडे पोहचले आणि त्या आज्जींच्या हातातून  जान्हवीचा हात ओढून घेऊन जवळ घेण्याऐवजी तिला २ धपाटे घातले आणि "कळत नाही का? कितीवेळा सांगितले आहे की असे कोणाबरोबर आम्हाला न सांगता जायचे नाही. तिथेच खेळायच्या ऐवजी त्यांच्याबरोबर कश्याला लांब जायचे",  असे म्हणून एवढ्याश्या २ वर्षाच्या मुलीला अजून ४ धपाटे घातले. हे सगळे काय चालले हे न कळल्यामुळे जान्हवीने मोठ्याने भोकाड पसरले. जसे काही ते दोघे माझ्यापासून जान्हवीला ओढून घेऊन जातील असे वाटून मी

जान्हवीला तिचा हात घट्ट पकडून माझ्या मागे घेतले, हेपण खूप घाबरले होते.  त्यांनी आज्जीआजोबांना वाटेल तसे बोलायला सुरुवात केली. ते दोघेपण खूपच घाबरले होते. त्यांच्याबरोबर आलेला स्टाफ आम्हा दोघांशी बोलायचा प्रयत्नपण करत होता पण आम्ही दोघे कोणाचेच ऐकणाच्या मनःस्थितित नव्हतो त्यामुळे त्याला शांत बसायला सांगून आम्ही आरडाओरडा करत पूर्ण हॉटेल डोक्यावर घेतले होते. आज्जीआजोबा खाली मान घालून उभे होते. ज्या स्टाफने त्या तिघांना आणले होते तो आम्ही काही ऐकत नाही म्हंटल्यावर मॅनेजरशी बोलून त्याला सगळा वृत्तांत सांगितला.

आम्ही थोडे शांत झाल्यावर हे मॅनेजरकडे पुढे काय करायचे हे विचारत त्याच्याकडे वळले. मॅनेजरने आम्हाला व आज्जीआजोबांना तिथे एका सोफ्यावर बसवले. आमच्याशेजारी त्या आज्जीआजोबांना बसवल्यावर आम्ही तिथून उठून उभे राहिलो तेव्हा त्याने आम्हाला दुसऱ्या सोफ्यावर बसवले. आज्जीआजोबा खाली मान घालून एकही शब्द न बोलता शांत बसून होते. मॅनेजरने आम्हाला पाणी देऊन चहापण दिला. आम्ही काहीही घ्यायला नकार दिल्यानंतर त्याने आम्हाला माझे थोडेसे

ऐकून घ्या म्हणून सांगितले आणि "संजय सांग सगळे", म्हणून त्या स्टाफला सांगितल्यावर त्याने बोलायला सुरुवात केली,"आज्जीआजोबा ह्या बाळाबरोबर खेळत असताना तिथे बागेत बाळासमोर अचानक मोठा साप आला.



खरेतर आमच्याकडे अजिबात साप किंवा असले प्राणी नाहीयेत पण कुठून कसा हा साप बागेत आला माहित नाही आणि आज्जींनी हे बघितल्यावर बाळाला एकदम मागे ओढणार तेवढ्यात त्या सापाने एकदम आज्जींच्याच पायावर दंश केला आणि तिकडून सरपटत निघून गेला. ह्याबाळाने घाबरून जोरात रडायला सुरुवात केली आणि आजोबापण एकदम घाबरून गेले. मी तिकडून जात असताना हे सगळे बघितले आणि पळत त्यांच्याकडे गेलो तोपर्यंत सापाने आज्जींना दंश केला होता. मी लगेच आज्जींना उचलून दवाखान्यात घेऊन जाऊ लागलो पण

बाळाला एकटे कसे सोडणार म्हणून आजोबांनी हिला कडेवर घेतले व सगळेजण दवाखान्यात गेलो. नशिबाने साप विषारी नसल्याने आज्जींना प्रथोमपचार करून लगेच सोडले आणि आम्ही लगेच इथे यायला निघालो" तिकडून निघताना आज्जीआजोबांना त्यांच्यापेक्षा तुमचीच काळजी जास्त होती, तुम्ही किती घाबरला असाल म्हणून दवाखान्यात थोडावेळसुद्धा न थांबता आम्ही लगेच हॉटेलवर आलो!”



हे सगळे ऐकून आम्ही सुन्न झालो होतो. काय बोलावे कळत नव्हते. मी जान्हवीला घट्ट धरून मिठी मारली, बिचारी आमची मनाली रडूनरडून शांत होऊन उसासे देत होती. पण मन सैरभैर

झाल्याने तिच्यावर काय गुजरत असेल ह्याकडे लक्षच दिले नव्हते. आज्जीआजोबा उठून आमच्याशेजारी येऊन बसले. लाजेने आम्ही अर्धेमेले होऊन खाली मान घालून बसलो.  आजोबांनी ह्यांच्या आणि आज्जींनी माझ्या खांद्यावर हात ठेवला तेव्हा मात्र माझा बांध सुटला आणि मी आज्जींच्या गळयात पडून रडायला सुरुवात केली. त्या माझं रडून होईपर्यंत पाठीवर थोपटत राहिल्या. रडू थांबल्यानंतरमात्र मी आणि ह्यांनी एकत्रच त्यांच्या पायावर डोके ठेवले, त्यांनी लगेच आम्हाला खांद्याला धरून उभे केले आणि जवळ घेतले. आम्ही दोघे त्यांची वारंवार माफी मागत होतो पण ते आमच्यावर जरासुद्धा चिडले नव्हते. थोड्यावेळाने आजोबा म्हणाले,"आम्हाला पूर्ण कल्पना आहे तुम्हा दोघांवर काय बेतले असेल! आपले मुलं नुकत्याच ओळख झालेल्या माणसांबरोबर अचानक गायब झाल्यावर  त्या आईबाबांवर काय परिस्थिती उद्भवली असेल ह्याची पूर्ण कल्पना आम्हा दोघांना आहे. तुम्ही जे वागलात ते समर्थनीय आहे. दवाखान्यातून परत येताना तुमच्या दोघांचाच चेहरा समोर येत होता आणि आम्हाला हे सगळे खरेच अपेक्षित होते. आमचा तुम्हावर जरासुद्धा राग नाहीये". हे ऐकल्यानंतर मात्र आम्हाला जे अपराधी वाटत होते ते थोडेसे कमी झाले. हळूहळू सगळी परिस्थिती नॉर्मल झाली. आज्जीआजोबांनी काही झालेच नसल्यासारखे एकदम व्यवस्थित बोलायला सुरुवात

केली. सगळेजण आपापल्या कामाला निघून गेले आणि तिथल्या मॅनेजरने आम्हाला स्पेशल ट्रीट देऊन तिथेच सगळे आणून दिले. आम्ही सगळ्यांनी आनंदाने हसतखेळत आमचे जेवण आटोपले आणि चक्कर मारायला  बाहेर पडलो. जान्हवी आमच्यापेक्षा अगोदर नॉर्मल झाली होती आणि ती लगेच आज्जीला जाऊन चिकटली. खरेच तेव्हा 'लहानपण देगा देवा' ही म्हण आठवली. लहान मुले मनात काही न ठेवता किती लवकर आहे ती परिस्थिती स्वीकारतात ना! त्यावेळी मीपण असेच वागायचा प्रयत्न करणार हे ठरवले (अर्थात मी हे लगेच विसरून पण गेले).

दुसऱ्यादिवशी सकाळी आम्ही नाश्त्यासाठी परत एकत्र भेटलो. बाहेर फिरायला जाणार होतो पण आज्जींना दगदग नको म्हणून त्या दोघांनी "तुम्ही तिघे बाहेर फिरून या" असे वारंवार सांगूनही आम्ही त्यांच्याबरोबर थांबलो. जान्हवीसुद्धा आज्जीआजोबांना सोडून यायला तयार नव्हती. मग आम्ही दुसऱ्या दिवशी सकाळी सूर्योदय बघायलाच हॉटेलमधून बाहेर पडायचे व आज हॉटेलमध्येच थांबून कायकाय करता येईल ह्याचा विचार करून आम्ही सगळ्यात अगोदर स्विमिंग करायचे ठरवले.  हे, आजोबा आणि जान्हवी तिघे पोहणार, मी आणि आज्जी तिथेच बसून पत्ते खेळणार असे ठरले. ते तिघेजण कपडे बदलून आत जायचे म्हणून पूलच्या अगदी कडेवर उभे राहून आम्ही गप्पा मारत

होतो, बहुतेक काहीतरी विनोद झाला होता कारण आम्ही खूप जोरात हसत होतो आणि आमचे ऐकून जान्हवीपण सगळे समजल्यासारखे जोरात हसायला लागली. आम्हाला तिचे हसणे बघून अजून जोरात हसू येत होते. सगळे जोरजोरात हसत असताना आमच्या बाईसाहेब थोड्याश्या मागे झाल्या आणि ..



एकदम पाण्यात धपकन पडल्यामुळे पाणी जोरदार वर उडाले आणि ती एकदम खाली गेली. आम्हाला दोघांना काहीही न सुचून आमचा जागेवर पुतळा झाला होता. तोपर्यंत आजोबांनी उडी मारून जान्हवीला बाहेर काढले आणि आमच्या पिलाला वाचवले. जान्हवीने मात्र डोळे वर केले होते आणि श्वासपण घेत नव्हती,

आमची सगळ्यांची जाम तंतरली होती पण ती लगेच शुद्धीवर आली आणि आम्हाला हुश्श झाले!

तिसरा  प्रसंग काही ओढवू नये म्हणून आम्ही खबरदारी घ्यायची ठरवली आणि हॉटेलच्या आतमध्येच वेळ घालवायचा ठरवला. पण होनी को कौन टाल सकता है!

दुपारी जेवायला म्हणून डायनिंग हॉलमध्ये गेलो. काल झालेल्या प्रसंगाने आम्हाला सगळे ओळखायला लागले होते आणि आमची सगळेजण खूप छान बडदास्त ठेवत होते. गरमागरम सूप, पंजाबी जेवण. शेवटी जान्हवीला आवडतात म्हणून आइस्क्रीम बरोबर गरम गरम गुलाबजाम व गाजरहलवा  घेऊन संजय आला आणि जान्हवीला मोठा बाउल भरून आइस्क्रीम देताना म्हणाला,"आईबाबांच्या मनालीसाठी खास आइस्क्रीम आणि गाजरहलवा, आज्जीआजोबांसाठी गुलाबजामून!" आमच्या प्रश्नार्थक मुद्रेकडे बघून त्याने हसत सांगितले,"काल दवाखान्यातून परत येताना गप्पा मारताना जान्हवीने आम्हाला सगळी माहिती दिली हो", हे सांगता सांगता संजयने ट्रे मधून सगळे काढून ठेवताना गुलाबजामून असलेल्या वाटीला ट्रेचा धक्का

लागला आणि गरम गुलाबजामून व पाक एकदम आज्जींच्या ज्या पायाला साप चावला होता त्या पायावरच पडला. मी लगेच उठून तिथे असलेल्या सगळ्या ग्लास मधले पाणी आज्जींच्या पायावर ओतले आणि बाजूच्या टेबलवरचे पाणी घेऊन तेपण ओतत राहिले. तोपर्यंत संजय बर्नोल घेऊन आला, वॉशरूममध्ये जाऊन मी त्यांना पायावर बर्नोल लावले आणि तिथे बसवून खूप वेळ पायावर पाणी ओतत राहिले. थोड्यावेळाने दाह कमी झाल्यावर आम्ही त्यांना रूममध्ये घेऊन जाऊन मी परत त्यांना टबमध्ये पाण्यात बसवले. आज्जींना ताप/सर्दी होऊ नये म्हणून ह्यांनी मला त्यांना बाहेर आणायला सांगितले. आम्ही सगळे त्यादिवशी त्यांच्याच रूममध्ये झोपलो. सकाळी आज्जी एकदम नॉर्मल झाल्या होत्या. भाजलेल्याचे डाग पण नव्हते आणि दुखतपण नव्हते. आज्जींनी मला लगेच सुचून त्यांच्या पायावर पाणी ओतले व त्यामुळे नायलॉनचा ड्रेस चिकटला नाही आणि फार त्रास झाला नाही म्हणून खूप कौतुक केले.

त्यादिवशी परत निघायचे असल्याने आम्ही आमच्या रूममध्ये जाऊन आवरून परत आज्जीआजोबांच्या रूममध्ये आलो व सगळे एकत्र नाश्ता करायला खाली आलो. त्यावेळी

आजोबांनी,"माफ करा आम्हाला, आम्ही तुमच्या ट्रिपची मज्जा घालवली, तुम्हाला साधा सूर्योदयपण बघता आला नाही". असे म्हणून माफी मागितली. आम्ही काही बोलणार तोपर्यंत मॅनेजर आमच्याकडे हसतहसत आला आणि म्हणाला, "हॉटेलने तुम्हाला अजून दोन दिवस राहण्याची विनंती केली आहे". सुट्टी नसल्याने आम्ही नकार दिला पण त्यांनी खूप विनंती केल्यामुळे आम्ही होकार दिला आणि त्यांनी आम्हाला स्पेशल पाहुण्यांसाठी असलेली luxury रूम आम्हाला देऊ केली. त्या दिवशी त्यांच्याकडे असलेल्या ऐसपैस गाडीने आम्हाला पूर्ण महाबळेश्वर फिरवून आणले. २ दिवस आम्हाला पूर्ण VIP सेवा दिली होती. आमचे कपडे पण धुवून दिले होते. आम्ही सगळ्यांनी मसाज, सोना बाथ पण घेतला. कसले रिलॅक्स वाटत होते. अहा! आणि हो आम्ही लग्नाचा वाढदिवस साजरा करायला आलेलो असल्यामुळे त्यांनी खूप छान केक आणून तो सगळ्या स्टाफ व तिथे असलेल्या पाहुण्यांबरोबर एकदम जोरदार पद्धतीने दणक्यात साजरा केला २ दिवस खूप म्हणजे खूपच छान गेले पण ते फुलपाखरासारखे कधी उडून गेले ते कळालेच नाही!




निघायच्या दिवशी सगळा स्टाफ आम्हाला भेटायला आला होता. संजयचे कुटुंब आम्हाला भेटायला आले होते. त्यांनी आम्ही तक्रार केली नाही म्हणून खूपदा आमचे आभार मानले. आज्जीआजोबा व आम्हाला त्यांनी मॅप्रोची मोठी बास्केट हॉटेलतर्फे गिफ्ट म्हणून दिली आणि अजून एक सरप्राईज दिले. आमच्यासाठी खास कालचीच गाडी आम्हाला घरी सोडण्यासाठी दिली होती.

त्यादिवशी मात्र आम्हाला देवाने सगळ्यात मोठी भेट दिली होती. ती म्हणजे हृदयाशी आणि आमच्या आयुष्याशी  कायमचे जोडले गेलेले आज्जीआजोबा!

## पहिला विमान प्रवास



आनंदना घाना मध्ये जॉब ऑफर आली तेव्हा आम्ही ती स्वीकारावी की नाही ह्याच विचारात होतो. पण नंतर विचारविनीमय करून असे ठरवले की हे दोन वर्षासाठी एकटेच जातील आणि मी दोन मुलींना घेऊन इथेच राहीन म्हणजे मग मला जॉबपण सोडायला लागला नसता. पण आपण जे ठरवतो तसेच नेहमी घडते असे होत नाही.

कॉन्ट्रॅक्ट साइन करताना तुमच्या बायकोला पण घेऊन या म्हणून डायरेक्टरने आम्हाला कळवले. माझ्याशी काय बोलायचे असेल हे न कळून आम्ही तसेच संभ्रमाअवस्थेत ऑफिसमध्ये पोहचलो. डायरेक्टर साहेबांचे वय साधारण ६०-६५ च्या दरम्यान असेल. गृहस्थ खूप चांगले वाटले. आम्ही गेल्यावर त्यांनी


माझ्याशी खूप छान गप्पा मारल्या, माझी सगळी माहिती विचारली आणि माझ्याशी बोलायला सुरुवात केली. मला म्हणाले,"तुझ्याशी बोलून खूप छान वाटले मला! खूप चांगला जॉब आहे तुझा, हा जॉब सोडून जायला तुला नको होत असेल ना!" मला काय उत्तर द्यावे तेच कळत नव्हते. पण त्यांनी माझ्या मनातले ओळखले आणि म्हणाले, "मला माहीत आहे, इतका चांगला जॉब, पगार सोडून मुलींना घेऊन कुठे आफ्रिकेत जंगलात जाऊन राहणार त्यापेक्षा इथेच राहिलेले बरे असे तुला वाटत असेल ना!" पण त्यांनी मला असे समजावून सांगितले की मला माझ्या बाबांची आठवण झाली.



त्यांनी सांगितले,"आमच्यावेळी बायका नवरा जिथे जायचा त्याच्या मागे जायच्या. मला अगदी मान्य आहे की आजकाल मुली ह्या स्वतंत्र झाल्या आहेत आणि त्यांनी व्हायला पण पाहिजे. बायकांमध्ये पुरुषांपेक्षा जास्त सहनशक्ती आणि कणखरपणा असतो, त्या एकट्या असल्या तरी सगळे निभावून नेऊ शकतात पण पुरुष जरी दाखवत असले तरीही ते खूप दिवस एकटे नाही राहू

शकत. बाहेरच्या देशात सगळे ओपन असल्यामुळे त्यांचा कधीही पाय घसरू शकतो आणि मला कुठलेही कुटुंब उध्वस्त करायचे नाहीये. त्यामुळे माझ्या कंपनीमध्ये मी सुरुवातीपासून एक पॉलिसी ठेवली आहे, मी कोणालाही कधीही फॅमिलीशिवाय घेत नाही. हं! अगदी लग्न झाले नसेल तर गोष्ट वेगळी. मी तुझ्या वडिलांच्या वयाचा आहे तर मी सांगतो म्हणून तू जाऊन बघ एकदा तिकडे. नक्कीच आवडेल तुला". अश्याप्रकारे त्यांनी मला खूप छान समजावून सांगितले आणि विचार करायला १० मिनिटं दिली.

मग काय! लग्नात बांधलेली गाठ अशी न सोडता आदर्श बायको बनून त्यांच्याबरोबर घानाला जायचा निर्णय घेतला आणि ह्यांनी कॉन्ट्रॅक्टवर सही केली.




हे मेमध्ये अगोदर जाऊन तिकडे घर, सामान घेऊन घर सेट केल्यावर आम्ही तिघी सप्टेंबरमध्ये तिकडे जायचे असे ठरले. त्यावेळी त्यांच्या बॉसने हेपण सांगितले की तुला २ लहान मुलींबरोबर एकटीला नाही पाठवणार, इकडून कोणी कुटुंब जाणारे असेल तर त्यांच्याबरोबरच पाठवू.

आर्या झाली आणि माझा महेंद्र मध्ये जॉब पक्का झाला म्हणून मग आम्ही माझ्या कंपनीजवळ एक फ्लॅट मिळत होता तो विकत घेतला. रहायला पण नव्हतो गेलो अजून आणि हा जॉब मिळाला. जान्हवी पावणेपाच आणि आर्या साडेपाच महिन्याची असताना आम्ही हा निर्णय घेतला. हे गेल्यानंतर मी बहिण संगिताच्या जवळ आणि तिथे शेजारी खूप चांगले होते म्हणून आईच्या घरी राहायला आले (आई भावाकडे US ला गेली होती). दोन्ही लहान मुलींना घेऊन एकटीने सगळे सांभाळून नोकरी करणे शक्य नसल्याने लगेच राजीनामा दिला होता. ह्या दरम्यान जान्हवी इतकी लहान असूनही बरीचशी कामे स्वतःहून समजून करत होती. बिल्डिंगच्या बाहेरच भाजीवाल्या, किराणा दुकान सगळे होते. बाईसाहेबांना खायची आणि करायची दोन्हीची आवड! त्यामुळे रोज सकाळी आम्ही आज काय खायला करायचे हे ठरवायचो आणि ही मस्त पिशवी पैसे घेऊन रोजच्या रोज भाजी, किराणा आणायची. संगिता रोज सकाळी चक्कर मारून काय हवे असेल ते आणून द्यायची पण तरीही अजून काही लागणार असेल तर जान्हवी लगेच जाऊन घेऊन यायची.

एकदा ५ वर्षाची जान्हवी भाजी आणायला गेली होती आणि तिथून एक मुलगा असा विचित्र नजरेने तिच्याकडे बघत तिथेच उभा राहिला. त्याच्याकडे तिचे लक्ष गेले तेव्हा तो तिच्याकडे बघून

हसला आणि हिला खूप भीती वाटली. आमच्या बिल्डिंगच्या बाजूलाच २-३ जण भाजी विकायला बसायचे, तिथल्या एका काकूंकडे जाऊन तिने भाजी विकत घेतली आणि त्यांना तिने 'मला खूप भीती वाटतीये' असे सांगितले. त्या काकू तिला गेटपर्यंत सोडायला आल्या. थोड्यावेळाने संगिता तिथून गाडीवर येत असताना त्यांनी तिला थांबवून निक्षून सांगितले, "तुम्ही इतक्या लहान मुलीला भाजी आणायला कसे पाठवता? आज ती कित्ती घाबरली होती, थोडीतरी काळजी घेत जा की!" खूप चिडली ती हे ऐकून आणि घरी येऊन ती मला,"मी रोज घरी येते, काय आणायचे आहे का विचारते, मग तू जान्हवीला भाजी, किराणा आणायला का पाठवतेस?" मला समजेचना आज हिला काय झाले? मी तिला म्हणाले,"अग जान्हवीलाच भाजी, किराणा आणायला आवडते. कालतर आम्ही खव्याचा एक नवीन पदार्थ करायचा ठरवला होता म्हणून मी तिला सांगितले की तू आर्याजवळ बस मी जाऊन खवा घेऊन येते. तर म्हणाली की तू घरी थांब तिच्याजवळ, मी जाऊन घेऊन येते असे म्हणून थोड्या लांब असलेल्या दुकानात जाऊन तिने खवा विकत आणला. काय झाले?" माझे ऐकून ती थोडी शांत झाली आणि तिने तिचे भाजीवाल्या बाईंबरोबर झालेले बोलणे मला सांगितले. ते ऐकून मीपण खूप गोंधळून जान्हवीला बोलावले आणि काय झाले म्हणून विचारले. तेव्हा तिने सगळा किस्सा सांगून

सगळे कळाल्यावर तू मला परत बाहेर पाठवणार नाहीस म्हणून मी तुला काहीच सांगितले नाही म्हणून सांगितले. त्यावेळी काय बोलावे ते सुचलेच नाही पण नंतर तिच्याशी बोलता बोलता आणि अनेक गोष्टींमधून मी तिला समजावून सांगितले आणि त्यानंतर आजतागायत तिने माझ्यापासून कधीही कुठलीही गोष्ट लपवून ठेवली नाहीये!



ह्या तीन महिन्यांत खूप साऱ्या अडचणींना तोंड द्यावे लागले पण संगिता आणि तिचे पूर्ण कुटुंब ह्यांचा खूप आधार होता मला त्यामुळे सगळे तरून गेले.

आम्ही निघायच्या अगोदर आई परत आली. लहान मुलींना घेऊन जायचे आणि तिथे काही मिळेल की नाही माहीत नाही म्हणून जितके सामान घेऊन जाऊ शकतो ते घेऊन जायचे असे ठरले, ट्रॅव्हल एजन्ट (ज्याने आमचे तिकीट बुक केले होते) त्यांना किती किलोची एक सुटकेस allow आहे म्हणून विचारले तर त्यांनी सांगितले असे काही नाहीये, तुम्ही पाहिजे तेवढे सामान एका बॅगेत भरू शकता. आम्हाला खूप आश्चर्य वाटत होते कारण अमेरिकेत तुम्ही ३२ किलोची एक अश्या २ सुटकेस घेऊन जाऊ

शकता आणि इथे ह्या एजन्ट ने सांगितले की कितीही किलोच्या प्रत्येकी २ सुटकेस नेऊ शकता. ज्या फॅमिलीबरोबर जाणार होतो त्यांनापण फोन करून किती किलोची एक सुटकेस घेऊन जाऊ शकतो आणि त्यांच्या सुटकेसमध्ये जर जागा असेल तर ते आमचे किती किलो वजन घेऊन जाऊ शकतात? हे विचारले. तर त्यांनी पण वजनाचे टेन्शन घेऊ नका तुम्ही हेच सांगितले आणि साधारण ६-७ किलो वजन आम्ही घेऊ शकतो म्हणून सांगितले. तेवढ्याच कमी सुटकेस न्यायला लागतील म्हणून आम्ही एक सुटकेस ५० किलोची भरली व त्यातलेच सामान काढून त्यांच्या बॅगेत द्यायचे हेपण ठरवले आणि बाकीच्या सुटकेसमध्ये ३२ किलोच भरले. सगळे पॅकिंग करून झाले. भरपूर सामान घेऊन जात होतो आणि आईने पण खूप सारे सामान आणले होते.

अखेरीस जायचा दिवस उजाडला. पहिल्यांदाच विमान प्रवास आणि २ लहान मुलींना घेऊन जायचे असल्याने टेन्शन आले होते. पण त्यातल्या त्यात हे समाधान होते की दोनीही मुली खूप शांत आणि ह्यांच्याच कंपनीमध्ये जॉब करणाऱ्या एका महाराष्ट्रीयन फॅमिलीबरोबर आम्ही जाणार असल्याने थोडा ताण कमी जाणवत होता. सगळे सोडायला येणार म्हणून एकच मोठी गाडी ठरवली होती. वेळेवर एअरपोर्ट वर पोहचून त्यांना फोन केला

तर त्यांनी सांगितले की आम्ही १० मिनिटात पोहचत आहोत, तुम्ही चेकइन काउंटर वर जाऊन आमची वाट बघा.



आर्याला कांगारू बॅगमध्ये ठेवून मी व जान्हवी ट्रॉली घेऊन निघालो. सगळे बाहेर उभेच होते. खुप धडधड होत होती. भल्यामोठ्या असलेल्या रांगेत जाऊन आम्ही उभे राहिलो, थोड्याच वेळात ती फॅमिली आली. मी त्यांना माझे सामान घ्याल का विचारले तर त्यांना ऐकूच आले नाही, दोनदा विचारून मग जे होईल ते बघता येईल हा विचार करून शांत बसले. आमचा नंबर आला आणि आर्याने रडायला सुरुवात केली. अगोदरच टेन्शन आले होते त्यात आर्या रडत होती तशीच काउंटरवर गेले तर ५० किलो ची सुटकेस बघून त्यांनी सांगितले की ३२ kg च्या वर सुटकेस घेत नाही. मग काय तिकडूनच एक सुटकेस विकत घेतली

आणि सामान ह्यातून त्यात घातले. परत रांगेत जाऊन उभे राहिलो, आमचा नंबर आला आणि आर्याने रडायला सुरुवात केली. सगळ्या सुटकेसचे वजन बरोबर होते. तिथे मला एक माणूस मदत करायला म्हणून आला आणि त्याने हॅन्डबॅग पण चेकइन काउंटर वर ठेवले त्यामुळे बरोबर ते ८ kg  जास्त भरले. आर्या रडत होती त्यामुळे माझ्या हे लक्षातच आले नाही. काउंटरवरची मुलगी आणि मला मदत करायला म्हणून आलेला तिचा हस्तक ह्यांनी मला सांगितले की वजन जास्त भरल्यामुळे Rs.१०,०००/- एक्सट्रा भरावे लागतील. आमच्याबरोबर जे होते त्यांनी काहीच मदत केली नाही की लक्ष दिले नाही पण तरीही मी त्यांना काय करू म्हणून विचारल्यावर सांगितले की मी देईन पैसे आणि  नंतर आनंदकडून घेईन. मग काय मी पैसे दिले आणि तिने मला कच्ची रिसीट दिली म्हणजे दोघांनी मिळून ते पैसे खाल्ले पण आर्या इतकी रडत होती की मला काय करावे ते कळतच नव्हते. एवढीशी ५ वर्षाची जान्हवी मात्र एकदम अगदी शहाण्यासारखी वागत होती. मला सगळी मदत करत होती, एवढे पैसे भरून त्या शहाण्याने आमची हॅन्डबॅग काउंटर वरून काढून परत मला दिली. मी त्याला सांगितले पण ही बॅगतर मी चेकइन केली आहे तर म्हणाला सोडा हो मॅडम तुम्हाला जास्त वजन नेऊ दिले ते बघा.



वेडी झाले होते मी. एरवी कायम तलवार घेऊन तयार असणारी मी काही बोलले नाही. तिकडून निघालो आणि आर्या एकदम शांत. माझ्याकडे आर्या, पर्स आणि ८ kg ची ट्रॉली बॅग होती, जान्हवीने तिच्या खांद्यावर ७ kg  वजनाची सॅक घेतली होती. एवढ्याश्या मुलीला ती खूप जड होती पण तरीही तिने एक अक्षर तोंडातून न काढता तशीच घेतली होती.

आम्ही सगळ्यांना भेटून आत गेलो. एकतर सगळ्यांना सोडून जात असल्यामुळे खूप रडू येत होते आणि वर टेन्शनपण वाढले होते.  आत जिथे बोर्डिंग पास व पासपोर्ट चेक करतात तिथे गेलो तर परत आर्याबाईंनी रडायला सुरुवात केली.



पण इथे मात्र त्याचा फायदा झाला, त्या बाईंनी जास्त काही चेक न करता लगेच आम्हाला आत पाठवले. आमचे विमान खूप दूर लागणार होते त्यामुळे खूप चालावे लागले. जान्हवी आणि मी दोघीही दमलो होतो. AC असुनपण घाम फुटला होता. रूममध्ये जाऊन बसल्यावर लगेच जान्हवीची सॅक खांद्यावरून काढली तर पोरगी एकदम कळवळली. आर्याला कांगारू बॅग मधून बाहेर

काढले, तर बाईसाहेब एकदम खुश झाल्या. पहाटे ४ वाजले होते. आम्ही ज्यांच्याबरोबर जात होतो त्यांचा मुलगा जान्हवीएवढाच! त्याला त्याच्या बाबांनी झोप आली म्हणून कडेवर घेतले होते पण जान्हवी माझ्याबरोबर इतका वेळ जागी होती आणि एकदाही झोप आली, पाय दुखतात वगैरे कुठलीही तक्रार केली नाही, खूप कौतुक वाटत होते मला तिचे.  खरेच ५ वर्षाची माझी लेक आहेच खूप समजूतदार.



परत विमानात जाताना, मी आर्याला कांगारू बॅगेत घालत होते तर नाही नाही म्हणून भोंगा काढला पण लवकर चालायला शिकल्यामुळे तिथे तुरुतुरु पळायला सुरुवात केली तर एवढे सामान घेऊन तिला पकडणे शक्य झाले नसते आणि मला सगळे घेऊन तिला कडेवर घेणेपण शक्य नव्हते, तिला ओरडून तसेच बॅगेत

घालून,सॅक जान्हवीच्या खांद्यावर व मी ट्रॉली आणि  पर्स घेऊन निघालो. पुढची सीट मिळाली होती,  आर्यासाठी पाळणा. फ्लाईट मध्ये एअर होस्टेसने सुद्धा काहीही मदत केली नाही. बॅग्स वर ठेवताना मी तिला मदत मागितली तर आम्ही नाही करू शकत म्हणाली. मग जान्हवी आर्याला घेऊन बसली आणि मी कशीतरी बॅग वर ठेवली आणि जागेवर बसले. आम्ही दोघी शारीरिकपेक्षा मानसिक दृष्ट्या खूप दमलो होतो.

फ्लाईट ने टेक ऑफ केल्यावर मी आर्याला त्या पाळण्यात ठेवले. जान्हवी, आर्या दोघीही शांतपणे झोपल्या. मला वॉशरूमला जायचे होते म्हणून एअरहोस्टेसला सांगितले तर तिने सरळ सरळ नकार दिला शेवटी नाईलाजाने जान्हवीला उठवले व जाऊन आले. प्रवास थांबून आमचे विमान केनियाला लँड झाले परत आम्ही एवढे जड सामान घेऊन खाली उतरलो.

परत तिकडून घानाला जायच्या विमानाकडे प्रस्थान केले. तिथेतर आमच्या विमानाकडे जाण्यासाठी खूप मोठा जिना उतरून जायचा होता आणि जान्हवीचे खांदे थोडे सुजले होते. त्यामुळे मागे सॅक, खांद्यावर पर्स, कांगारू बॅगेत आर्या आणि हातात सुटकेस असा सगळा सरंजाम घेऊन आम्ही तिघी चालत होतो. मला सगळे

सांभाळताच येत नव्हते. अर्धा जिना उतरल्यावर इतकी दमले की तिथे २ मिनिट खालीच बसले. मग जान्हवीने हातातली सुटकेस घेतली पण तिलापण खूप त्रास होत होता मग थोडावेळ ती, थोडावेळ मी अशी सुटकेस घेऊन आम्ही कसातरी जिने उतरलो आणि परत विमानात जाण्यासाठी दुसरा जिना चढायला सुरुवात केली. अशक्य इतक्या उंच पायऱ्या होत्या.



दरवाज्यात आले आणि माझ्या डोळ्यातून पाणी वाहायला लागले. ह्यावेळी नशीब चांगले होते. एअरहोस्टेस खूप चांगली होती, तिने माझ्या खांद्यावरची सॅक व सुटकेस घेतली आणि आम्हाला सीट दाखवून बॅग्सपण वर ठेवल्या. इतका मानसिक त्रास होत होता की कुठून आपण घानाला चाललो आहोत असे राहून

राहून वाटत होते. पण पुढचा प्रवास छान झाला. एकदाचे विमान लँड झाले, एअरहोस्टेसने येऊन माझी बॅग व सॅक खाली आणून दिली. मी तिचे खूपवेळा आभार मानले, आणि अजूनही प्रार्थना करते की देव तिचे सगळे  चांगले करो!

आता परत मोठ्या सुटकेस काढणे, ट्रॉलीमध्ये ठेवणे हे करावे लागणार ह्या विचारानेच नको झाले पण तिथे कामाला असणारे एक गृहस्थ मला बघून स्वतःहून माझ्याकडे आले आणि मला एक ट्रॉली दिली.  मला २ मिनिट कळत नव्हते की त्यांच्याकडून मदत घ्यायची की नाही पण त्यांनी सांगितलं की तुझ्या नवऱ्याने मला तुझी मदत करायला सांगितले आहे. मग मी बिनधास्त झाले. ट्रॉलीमध्ये वर आर्याला बसवून त्यावर त्याने आमच्या हॅन्डबॅग्स ठेवल्या आणि त्यांनी आमच्या मेन सुटकेसची ट्रॉली घेऊन आम्ही बाहेर आलो. ह्यांना बघितले आणि माझ्या सहनशक्तीचा बांध सुटला पण ह्यांचा मित्र पण आम्हाला घ्यायला आला होता. त्याची ओळख करून दिल्यामुळे मी आलेलं रडू दाबून ठेवले. जान्हवीने बाबांना घट्ट मिठी मारली, आर्यापण लगेच ह्यांच्याकडे गेली,  मी पर्स सुद्धा हातात न घेता हात हलवत चालत कार मध्ये बसले.


# रोमांचक प्रवास



माझा सगळ्यात पहिला परदेशप्रवास - घाना (East Africa). खूप छान देश आहे हा.  छान infrastructure  आणि लोकपण खूप चांगली आहेत. नशिबाने तिथे पोहोचलो आणी 2 ते 3 दिवसात  ७-८ कुटुंब असलेल्यांच्या छान ग्रुप मिळाला.

आमच्या ग्रुपने ख्रिसमसच्या सुट्टीत काकुम नॅशनल पार्कला फिरायला जायचे ठरवले. हे ठिकाण झुलता पूल व घनदाट

जंगलांसाठी प्रसिद्ध आहे. त्या पुलाचे वैशिष्ट्य म्हणजे ७ पूल ८ झाडांमध्ये विभागले गेले आहेत आणि 2 झाडांमधले अंतर (म्हणजे १ पूल) जवळ जवळ ७ ते ८ फुटाचे आहे. जमिनीपासून १३० फूट उंचीवर बांधलेले आहे. एकूण ७ पुलांचा walkway १००० फूट एवढा आहे. पुलावरून खाली फक्त घनदाट जंगल दिसते. पूल लाकडी फळीनी दोन जाडजूड दोऱ्याने बांधलेला होता. महत्वाचे म्हणजे एकदा पूल चालायला सुरुवात केले की पूर्ण 7 पूल पार करावेच लागतात, परतीचा मार्ग नाही.




आम्ही सगळेजण Hans Cottage Botel म्हणून जवळच असलेल्या रिसॉर्टमध्ये उतरलो होतो. जवळपास सगळेजण शाकाहारी असल्याने आणि त्यावेळी तिथे शाकाहारी जेवण खूपच

क्वचित मिळायचे त्यात भारतीय जेवण मिळणे तर खूपच दुर्मिळ असायचे त्यामुळे आम्ही खूपसारे टिकणारे पदार्थ करून घेतले होते. प्रत्येकजण आपापल्या गाडीने निघालो होतो. त्यामुळे प्रवासात खायला म्हणून मी अजून काही पदार्थ करून घेतले होते. जाताजाता आम्ही वाटेत २-३ दा थांबून सगळयांनी मिळून नाश्ता, चहा घेण्यासाठी म्हणून थांबलो. संध्याकाळी हॉटेलमध्ये पोहचलो आणि सगळी मुलं फ्रेश होऊन खेळायला लगेच बाहेर पडली. आमच्या ग्रुपमधली रश्मी मुलांबरोबर खूप छान खेळायची आणि मुलंपण तिच्याबरोबर खुश असायची. जशी मुलं बाहेर पडली तशी तीपण तिच्या २ मुलींना घेऊन सगळया मुलांबरोबर छान वेगवेगळे खेळ खेळत होती. आम्ही थोडे फ्रेश होऊन त्यांना जॉईन झालो आणि सगळयांनी मिळून रुमालपणी, आंधळी कोशिंबीर, साखळी असे खूप वेगवेगळया प्रकारचे खेळ खेळलो. खूप मज्जा आली.



रात्री मस्त जेवून सगळयांनी मिळून पोहायला जायचे ठरवले. सगळी लहान मुलं बेबी पूलमध्ये आणि मोठे डीप मध्ये गेले होते. मला एकतर पोहता येत नव्हते आणि आर्या लहान असल्याने मी आपली तिच्याबरोबर बेबीपूलमध्ये सगळया मुलांबरोबर राहणार म्हणून सांगितल्यावर बाकीचे सगळे निर्धास्तपणे डीपपूलमध्ये पोहायला गेले. सगळी मुलं व मी आम्ही पूलमध्ये एकमेकांवर पाणी उडवणे, बॉल खेळणे, कॉइन आत टाकून शोधणे असे काही खूप वेगवेगळे प्रकार करून खूप मज्जा केली. थोड्यावेळाने सगळया मुलांना बाहेर काढून अंघोळ घालून सगळयांना २ खोल्यांमध्ये झोपवून मीपण मोठ्यांबरोबर जॉईन झाले. खूपजणींना पोहता येत नसल्याने आम्ही खूप खोलात न जातापण सगळे मिळून बॉल खेळलो. थोड्यावेळाने सगळे बाहेर येऊन मस्त जुनी गाणी लावून बसलो होतो. खूप छान वाटले.



दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून हॉटेलमधलाच नाश्ता (ब्रेड, ज्युस आणि भरपूर फळे) करून आम्ही झुलत्या पुलाचा अनुभव घ्यायचा म्हणून उत्साहाने निघालो.

जान्हवी ह्यांच्याबरोबर व आर्या सव्वा वर्षाची असल्याकारणाने मी तिला पुढे घेऊन कपड्याने घट्ट अंगाभोवती गुंडाळले (इथे लोकल बायका लहान मुलांना पाठीवर घेऊन अश्याप्रकारे गुंडाळून सर्व कामे करतात) आणि प्रवास सुरु केला.



पुढचा माणूस माझ्या ग्रुपमधलाच एक होता, तो अर्ध्या रस्त्यापर्यंत गेल्यावर मी आर्याला घेऊन पुलावर पाय ठेवला. थोडेसे चालून गेल्यावर जाणवले की पूल हलत आहे. वाचाच बसली, काय करावे सुचत नव्हते. नशीब आर्या झोपली होती.

जसे जसे पुढे सरकत होते  तसतशी भीती वाढतच होती, एकदम सावकाशीने पुढे पुढे जात होते, थोडा जरी तोल गेला असता तर खाली पडायची भीती!

कसेबसे अर्धे अंतर पार केले. मागे एक युरोपियन माणसाने चालायला सुरुवात केली. त्याला अजिबात भीती वाटत नव्हती, त्यामुळे तो पटापट मोठ्यामोठ्या ढांगा टाकत चालायला लागला. पूल हलायलाच लागला.  माझीतर पुढे पाउल टाकायची हिम्मतच होईना.

मी त्याला जोरात ओरडले की मला खूप भीती वाटतीये आणि माझ्याबरोबर लहान मुलगी आहे, please तू हळू चाल, तर त्याला आणखीनच चेव चढला आणी माझ्या ओरडण्याने आर्या उठली...

तिला अशी बांधून राहायची सवय नसल्याने रडायला लागली व जोरजोरात हलायला लागली आणि  घाबरून तिच्याबरोबर मीपण रडायला लागले, कपडा सुटला तर ..  तिला दोन्ही हाताने धरले आणि तोल गेला तर... काहीच कळत नव्हते. एका हाताने आर्याला पकडले व एका हाताने दोरी. शेवटी त्या माणसाच्या बायकोने त्याला मी पूल पार करेपर्यंत जागेवर थांबायला सांगितले.



पुढच्या झाडाच्या पारावर ग्रुपमधले दोघेजण होते, त्यांनी मला धीर दिला व सांगितले की आर्याला घट्ट बांधले आहे, ती पडणार नाही, तू दोन्हीही हात दोरीला धरून हळू हळू चालत ये.

सगळेजण घाबरले होते. देवाचे नाव घेत व आर्याशी गप्पा मारत मारत कशीबशी हळूहळू चालत एकदाचा पूल पार केला. (माझ्यासाठी पुढची दोन माणसेपण थांबली होती, मी पोहचल्यावर मग मात्र त्यांनी चालायला सुरुवात केली). जसे तिला ओढणीतून सोडले तश्या बाईसाहेब एकदम खुश झाल्या, तिथे बसून तिला खायला दिले तोपर्यंत हे व जान्हवी पूल पार करून आले. जान्हवीपण खूप घाबरली होती, मोठी माणसेपण घाबरत होती

चालायला त्यामानाने हितर 5 वर्षाचीच होती, पण माझा व आर्याचा गोंधळ बघून बिचारी काहीही बोलली नाही, फक्त आल्याआल्या मला मिठी मारून 'आई मी एकटीने चालत पूल क्रॉस केला' एवढेच म्हणाली व आर्याला रडायचे नाही म्हणून समजवायला लागली.( खरेच देवाने नक्षत्रासारख्या मुली दिल्या आहेत).

आता परत तर जाता येणार नव्हते आणि अजून सहा पूल पार करायचे बाकी होते.

काय करावे काही कळत नव्हते. हे म्हणाले, मी आर्याला कडेवर घेऊन जातो, तू ताईला घेऊन ये. मी अगोदर साफ नकार दिला (कारण त्या पुलाची उंची साधारणतः ह्यांच्या कंबरेपर्यंत असेल) पण शेवटी दुसरा कुठलाच मार्ग न सुचल्याने मान्य करण्याशिवाय पर्यायच उरला नव्हता.

आर्या एकदम fresh झाली होती. तिला आम्ही तिघांनीमिळून समजावून सांगितले की बाबा तुला कडेवर घेऊन चालणार आहेत, अजिबात हलायचे नाही आणि तिनेपण सगळे समजल्यासारखे अगदी हो हो म्हणून सांगितले.

आता ह्यांचा आर्याला घेऊन हा प्रवास सुरु झाला. हळूहळू चालत त्यांनी दुसरा पूल व्यवस्थितपणे पार केला आणि महत्वाचे

म्हणजे आर्यापण शहाण्या बाळासारखी  अजिबात न हलता बाबांच्या कडेवर बसून मजा करत होती. त्यांच्यामागोमाग आम्ही दोघींनी पण पूल पार केला.

दोन पूल पार केल्यानंतर भीती हळूहळू कमी होत गेली आणि शेवटचे 3-४ पूल तर आम्ही खूप मज्जा करत निसर्गसौंदर्य अनुभवत पार केले. खूप छान वाटत होते, पक्ष्यांचे खूप विविध आवाज ऐकायला मिळाले, वेगवेगळ्या प्रकारची झाडे, 130 फूट उंचीवर तो पूल बांधला होता पण त्याहीपेक्षा उंच झाडे होती. खूप छान वाटत होते.

शेवटचा पूल पार करून तिथे असलेल्या शेडमध्ये आम्ही पोहचलो तर तिथे असलेल्या सगळ्या लोकांनी आमचे उठून टाळ्या वाजवून स्वागत केले.

अश्याप्रकारे आमची रोमांचक व अविस्मरणीय ट्रिप सुफळ संपन्न झाली.

# समोर दिसलेला मृत्यू



माझी आई युगांडाला आमच्याबरोबर थोड्या दिवसांसाठी राहायला आली होती. त्यावेळी तिला वेगवेगळी ठिकाणे दाखवण्यासाठी खूप फिरलो. खूप साऱ्या ट्रिप्स अविस्मरणीय होत्या पण त्यातली एक ट्रिप कायम लक्षात राहिली ती म्हणजे - Queen एलीझाबेथ नॅशनल पार्क...

आम्ही 3 कुटुंब मिळून जंगल सफारीला जाणार होतो. एकत्र मज्जा येईल म्हणून बसच बुक केली होती. साधारण 6 तासाचा प्रवास असल्यामुळे पहाटे 5 वाजताच घरून निघालो.




खूप मज्जा केली जाताना. दमशराज, नावाच्या, गावाच्या, गाण्याच्या भेंड्या असे खूप सारे खेळ खेळलो आणि बसमध्ये खायला म्हणून प्रत्येकाने भरपूर नाश्ता करून घेतला होता. त्यामुळे 6 तास कसे गेले ते समजलेच नाही. हॉटेलमध्ये थोडा आराम करून दुपारच्या जंगल सफारीला म्हणून बाहेर पडलो. साधारण 4 ते 6.30 ह्या वेळेत तुम्हाला जंगलात घेऊन जातात. त्यावेळी बरेचसे प्राणी दिसले, खूप वेगवेगळे पक्षी दिसले. परत जाताना तर संध्याकाळचा संधीप्रकाश आणि  सिंहाच्या जोडीवर त्याची छटा.. हे दृश्यच इतके

विलोभनीय होते की मनविभोर झाले. अश्या तऱ्हेने दिवस सत्कारणी लागला.



दुसऱ्या दिवशी सकाळी नाश्ता करून परत सफारीसाठी आमची यात्रा सुरू झाली. पहाटेच तुफान पाऊस पडून गेल्यामुळे वातावरणातला गारवा सुखावणारा होता पण सकाळी कुठलेच वेगळे प्राणी बघायला न मिळाल्यामुळे थोडा विरस झाला होता. दुपारी जंगलातच असलेल्या सेरेना हॉटेलमध्ये थांबून तिथूनच संध्याकाळची सफारी करून नंतरच आम्ही रहात असलेल्या हॉटेलमध्ये जायचे हे ठरवून तिथेच वेळ घालवला, विश्रांती घेऊन आता आपल्याला सगळे प्राणी, पक्षी दिसणार ह्या उमेदीने सगळे संध्याकाळच्या सफारीला निघालो.

सुरुवातीला 1 तास एकही प्राणी किंवा पक्षीसुद्धा दिसला नाही. इतकेच काय तर युगांडन कॉब आणि म्हशी सगळीकडे असतात त्यांचे सुद्धा दर्शन झाले नाही.  काही कळतच नव्हते. अगदी आम्ही सगळ्यांनी मिळून काहींनी गणपतीला, काहींनी देवीला तर काहींनी श्रीकृष्णाला असे प्रत्येकाने कुठल्या न कुठल्या देवाला साकडे घातले. बहुतेक देवाला आमची दया आली असणार कारण थोड्याचवेळात गाईडला वॉकीटॉकी वर कुठेतरी चित्ता दिसल्याचे समजले, आमच्याबरोबर बऱ्याच गाड्या त्या दिशेने धावल्या.



नुकतीच केलेली शिकार झाडाच्या वरच्या फांदीवर लटकवून तो मस्त आराम करत बसला होता. गाईडने आम्हाला शांत राहण्यास सांगितले होते तरीही आमची एकदम हळू आवाजात

कुजबुज सुरूच होती. ह्या चित्त्याने आपली शिकार झाडावर कशी काय नेऊन ठेवली असेल, लगेच का खात नसेल वगैरे...

नंतर खूप प्रकारचे सिंहाचे व जिराफचे पूर्ण कुटुंब, युगांडन कॉबचे, झेब्राचे, म्हशींचे, हत्तीचे कळप, अनेक प्रकारचे साप, 2 साप तर एकमेकांना गुंडाळून हवेत गिरकी घेताना सुद्धा पाहिले. अगदी आमच्या बसच्या बाजूला हे झाल्यामुळे तर थोडी भीती पण वाटली.



चित्त्यामुळे सगळया गाड्यांना निघायला उशीर झाला होता. पहाटे पाऊस पडून गेल्यामुळे आणि आम्ही चित्त्याला बघण्यासाठी ज्या वाटेवरून जायला परवानगी असलेला रस्ता सोडून आत गेल्यामुळे चिखल झालेल्या ठिकाणाहून गाडी चालवायला लागत

होती. आमचा गाईड आणि ड्रायव्हर दोघेही खूप चांगले होते. संध्याकाळच्या वेळेत  आणि इतक्या चांगल्या वातावरणात सगळे प्राणी बाहेर पडतात तरीही आमचा गाईड चिखलात गाडी घुसू नये म्हणून खाली उतरून बघून ड्रायव्हरला  रस्ता सांगत होता. संध्याकाळ होऊन गेल्यामुळे सगळेच घाबरले होते. पण गाईडमुळे आम्ही  जंगलात असलेल्या हॉटेलजवळ 8 वाजेपर्यंत पोहचलो(आम्ही त्याला जिथून घेतले होते) . तिकडे पोहचल्यावर आम्हाला सांगितले की तिथून येताना 3 गाड्या चिखलात अडकल्या आणि त्यांची सुटका करण्यासाठी रेस्क्यूटीम गेली होती. त्यावेळी आम्ही देवाचे इतका चांगला गाईड मिळवून दिल्याबद्दल मनापासून आभार मानले.



आम्ही जंगलाच्या बाहेरचे हॉटेल बुक केले होते, तिथे तुम्हाला संध्याकाळी 7 नंतर गाडी चालवायला परवानगी नसते पण आमचे हॉटेल जंगलाच्या बाहेर होते आणि बाहेर जायला खूप मोठे जंगल पार करून जावे लागते. season असल्यामुळे सेरेना हॉटेल फुल्ल होते, एकही रूम शिल्लक नव्हती. त्यामुळे तिथे राहायची सुद्धा सोय होणार नव्हती आणि लहान मुलंपण बरोबर होती म्हणून आमच्या गाईडने तिथल्या सेक्युरिटीशी बोलून त्यांना सगळी परिस्थिती सांगून परवानगी घेतली.

दुपारपासून बसमध्येच बसून असल्याने सगळ्यांना वॉशरूमला जायचे होते, सगळेजण जीव मुठीत घेऊन खाली उतरले. मी व माझी छोटी लेक आर्या आणि माझी आई व जान्हवी असे आम्ही एकमेकांचे हात धरून वॉशरूमला गेलो. सगळेजण परत जाऊन बसमध्ये बसू लागले पण माझी एक मैत्रीण तिच्या लहान मुलीला वॉशरूमला घेऊन गेली होती म्हणून तिच्यासाठी मी आणि आर्या थांबलो होतो. त्या बसमध्ये चढेपर्यंत मी व आर्या खाली थांबलो, आणि आर्या एकदम पुढे उभी असलेली थोडी मागे वळली. मी तिला उचलून घेऊन पायरीवर चढवून मी एक पाय पायरीवर ठेवला आणि एकदम बिबट्या चालत येत असलेला

बघितला! एकदम बोबडीच वळली. पटकन दुसरा पाय पायरीवर ठेवला आणि तो अगदी जवळ आला. ड्रायव्हर दरवाज्यापाशीच उभा असल्याने त्याने आतून पटकन दार बंद केले. मी आर्याला घट्ट पकडून मागे घेतले होते पण भीतीपायी तिला परत सोडायचे पण लक्षात नाही आले. आईने आर्याला घेतले व ह्यांनी मला थोडे हलवल्यावर मग मी शुद्धीवर आले. जाताना सगळ्यांना पुढे बसायचे होते, खिडकीकडे बसायचे होते, मागे बसले की उलटी होती, चक्कर येते म्हणून म्हणणारे बसमध्ये शिरल्याशिरल्या मागे जाऊन बसले. मला व आर्याला पुढचीच सीट रिकामी राहिली होती. माझी अवस्था बघून आईने मला तिच्या जागेवर बसायला सांगितले पण मी तिला निक्षून नाही म्हणून सांगून मी व आर्या पुढच्या सीटवर व आमच्या बाजूच्या सीटवर हे असे बसलो, आमचा परत थरारक प्रवास सुरु झाला...

सेक्युरिटी व गाईड ने ड्रायव्हरला खूप साऱ्या सूचना देऊन झाल्यावर आम्ही तिकडून जायला निघालो. ज्या बिबट्याने मला घाबरवले होते तो बिबट्या आमच्याबरोबर पुढची १० मिनिट गाडीच्या बाजूने चालत होता. तेव्हामात्र चित्ता बघताना गाईडने वारंवार सांगूनही शांत न बसणाऱ्या आम्ही आत्ता एकदम शांत

झालो होतो. चुकून आवाज झाला आणि त्याने ऐकलं आणि काही केले तर ह्या भीतीने बसमध्ये एकदम शांतता पसरली होती. लहान मुलीसुद्धा सगळे समजल्याप्रमाणे शांत बसल्या होत्या.



आम्ही दोघे पुढच्या सीटवर बसल्याने आम्हाला पुढच्या काचेतून सगळे दृश्य दिसत होते. तो काळोख आणि बसमधील निःशब्दता खरेतर असह्य होत होते, अंगावर काटा आला होता, भीतीने गाळण झाली होती, जीव कंठाशी आला होता. पुढच्या क्षणी काय होणार हे माहित नव्हते. पण बस सुरु झाल्यावर ती वाऱ्याची झुळूक, रातकिड्यांचा आवाज, एका लयीत हलणारी गवताची पाने, मध्येमध्ये असणाऱ्या झाडांच्या पानाच्या आवाजाची झुळझुळ, मध्येच येणारे प्राण्यांचे,पक्ष्यांचे आवाज अंगावर रोमांच आणत होता. का माहीत नाही पण त्यावेळी

काहीतरी वेगळीच जाणीव होऊ लागली होती, खूप शांत आणि हलके वाटत होते, कुठलेतरी मनावरचे ओझे उतरल्यासारखे वाटत होते. जसे काही मनात साठवून ठेवलेल्या आणि त्याची अडगळ असह्य झालेल्या गोष्टी एकदम गायब झाल्या होत्या आणि मन पूर्णपणे रिकामे झाले होते.. (त्यानंतर खूप दिवस मन हलके झाल्यामुळे खूप छान वाटत होते.) आणि अचानक डोळ्यातून पाणी वाहायला लागले. तो सुखद व आनंद देणारा अनुभव अविस्मरणीय व बऱ्याच आनंद देणाऱ्या क्षणांमधला एक होता. मला नक्की खात्री आहे कि हाच अनुभव ह्यांना आणि ड्रायव्हरला आला असणार.

बस एकदम संथ गतीने चालली होती. अंधाराची डोळ्यांना सवय होऊन बाहेरचं सगळे दिसायला पण लागले होते. जर समोरून एखादे जनावर रस्ता पार करत असेल तर आम्ही बस बंद करून तो पार केल्यावर मग पुढे जायचे असे चालू होते. बरेचसे प्राणी, त्यांचे कळप बघायला मिळाले. सकाळी पाणघोडा पाण्यात डुंबताना बघितले होते पण इथे प्रत्यक्ष पूर्ण बघायला मिळाला. मध्येच एक मोठा हत्तींचा आणि त्यांची खूप सारी पिल्लं कळप असलेला रस्त्यावर येऊन उभा राहिला एकेक करून सरळ रांगेत ते रस्ता पार करत होते. खूप वेळ आम्ही तिथे उभे राहिलो होतो. त्यांनी रस्ता पार करताच आम्ही गाडी सुरु केली आणि एकदम धिप्पाड

असलेल्या २ हत्तींनी मागे वळून बघितले. एकतर त्यांचे डोळे अंधारात चमकत होते. आईशपथ सांगते असे वाटले आता आम्ही संपलो. हत्ती, पाणघोडा व गेंडा हे ताकतवर प्राणी. एका झटक्यात त्यांनी बस उलथापालथी केली असती. ड्रायव्हरने लगेच गाडी बंद केली आणि जवळपास १५-२० मिनिटं आम्ही ते अगदी दूर जाईपर्यंत थांबून राहिलो. त्यानंतर  मात्र कोणी दिसले तर ते रस्त्यापासून पूर्ण आत जाईपर्यंत आम्ही थांबत होतो.



एक धिप्पाड पाणघोडा आमच्या बससमोरून रस्ता पार करताना आम्ही गाडी बंद करून उभे होतो आणि त्याने रस्त्याच्या मध्येच आमच्याकडे बघितले, ते चमकणारे डोळे आमच्याकडे बघत असतानाच एकदम पूर्णच बसकडे वळला. एकदम न सुचून

ड्रायव्हर  ने गाडी मागे घेतली तर तो एकदम पुढे यायला लागला. त्याक्षणीच गाडी बंद करून हेडलाईट पण बंद केले आणि काय होईल ते परमेश्वराच्या हातात सोपवून उभे राहिलो. (नंतर  ड्रायव्हर ने सांगितले कि जर जोरात गाडी अजून  मागे घेतली असती आणि तिथे बाकीचेपण प्राणी असतील तर सगळ्यांनी मिळून गाडीवर हल्ला केला असता असा विचार मनात येताच त्याने गाडी बंद केली आणि हेडलाईट आपोआप बंद केले गेले) पाणघोडा हळूहळू चालत बसकडे येत होता



आणि आम्ही जीव मुठीत धरून बसलो होतो. अचानक तो चालायचे थांबला आणि गाडीकडे बघत बसला. बहुतेक त्याच्या मनात आले असेल कि आत्ता इथे उजेड दिसला होता आणि एकदम कसलातरी आवाज आला होता आणि एकदम बंद कसा काय झाला हा विचार करून तो गोंधळून जागेवरच थांबला असावा किंवा आमच्यासारखे घाबरला पण असू शकतो नाही का! खूपवेळ एकाच जागी उभा राहून खूपच कंटाळा येऊन शेवटी त्याने रस्ता पार केला, त्यानंतरही आम्ही जवळपास ५ मिनिट काय माहित तिथेच लपून बसला असेल आणि एकदम  बाहेर आला तर ह्याविचाराने तसेच उभे राहिलो.

थोड्या अंतरावर रस्त्याच्या उजव्या बाजूला सिंहाचे कुटुंब होते. काहीजण बसले होते तर काहीजण उभे होते. सिंह मस्त एकेठिकाणी उभा राहून गार वाऱ्याचा आनंद घेत होता, एक सिंहीण पहुडली होती आणि तिची ४-५  पिल्ले तिच्या अंगावर खेळात होती, तर दुसरी सिंहीण सिंहाच्या आजूबाजूला फिरत होती, तर तिसरी पडून स्वतःचे अंग स्वच्छ करत होती.  लगेच बस आणि हेडलाईट्स दोन्ही बंद करून तिथेच उभे राहिलो. तिकडून ते हलत पण नव्हते! ड्रायव्हरला काय करावे कळत नसावे. गाडीचा आवाज येऊन एकदम त्यांनी हल्ला केला तर!  खूप वेळ थांबलो, शेवटी लाईट सुरु न करता गाडी सुरु केली. सगळ्यांचे डोळे आमच्या

दिशेने चमकत होते, भीतीने काळजाचा ठोका चुकला होता पण तसेच गाडी एकदम हळू वेगात पुढे जाऊ लागली आणि ते डोळे दिसेनासे होईपर्यंत आमच्याकडेच बघत होते.



पुढे काही अंतरावर जवळपास १०-१२ फूट अजस्त्र अजगर बससमोरून झर्रकन निघून गेले. हरण, काळवीट ह्यांचे कळप गाडीचा आवाज बघून घाबरून जोरजोरात उड्या मारत पळत होते. जिराफ, हत्ती, गेंडे, पाणघोडे, युगांडन कॉब, झेब्रे, हरीण, काळवीट, लांडगे, वानर, माकडं,  सिंह, बिबट्या, चित्ता, अजूनही बरेच प्राणी व त्यांचे कळप, ४-५ प्रकाराचे साप बघायला मिळाले.

हळूहळू नंतर थोडी भीती कमी होत गेली आणि थांबत थांबत बाहेरचे दृश्य, आवाज, वेगवेगळे प्राणी, त्यांचे आमच्याकडे बघत

असताना चमकणारे डोळे, हरणांची भीतीने उड्या मारत जाणे (आणि त्यांना बघून न घाबरता आम्ही गाडी थांबवत होतो) झर्रकन सरपटत जाणारे  साप, पक्षी ( एक घुबड  झाडाच्या टोकावर बसून आवाज करत होते, डोळे चमकल्यामुळे पटकन तिकडे लक्ष गेले होते), हे सगळे आणि ते वातावरण, रात्रीची शांतता पुढे बसल्यामुळे अनुभवता आली. तो अनुभव काही वेगळाच होता आणि खूप काही शिकून गेला. त्याक्षणी असे वाटले कि पुढच्या क्षणी आपल्याबरोबर काय होईल हे सांगता येत नाही तरीही आपण पुढच्या १० वर्षाचे प्लॅनिंग करून तेव्हा छान जगायला मिळावे म्हणून आज जगायचे विसरतो. हा विचार केलाच पाहिजे पण त्याबरोबर आजपण जगता यायला हवे.

अश्यारीतीने हळूहळू करत आम्ही एकदाचे जंगल पार केले आणि नंतर मात्र सुसाट वेगात काही वेळातच हॉटेल गाठले. आम्ही दोघे, आई व ड्रायव्हर सोडला तर सगळे इतके शांत झोपले होते कि गाडी बंद केल्यावर सगळ्यांना उठवावे लागले  (त्यांना असेच वाटले असेल कि कुठले तरी जनावर आले आहे म्हणून गाडी थांबवली आहे म्हणून). रूममध्ये जाऊन सगळे तसेच झोपले पण आम्ही दोघे मात्र नंतर बराचवेळ तो अनुभव हृदयात साठवत शांतपणे खूप वेळ नुसतेच बसून होतो.

# दुबई ट्रिप



आम्ही युगांडाला असताना भारतात सुट्टीसाठी जाताना ४ दिवस दुबई बघून नंतर भारतात जायचे हे ठरवले. तिथल्याच एका एजन्टकडे बुकिंग केले तेव्हा त्याने विचारले की अजून एका कपलला दुबई बघायचे आहे आणि त्यांना कोणाबरोबर तरी जायचे आहे तर तुम्हाला चालेल का? आम्ही लगेच होकार दिला.



आम्ही चौघे, माझी आई व ते कपल असे आम्ही दुबई ट्रिपसाठी निघालो. विमानप्रवास छान झाला. एअरपोर्टवर आम्हाला घ्यायला भारतीय चालक  असलेली गाडी आली होती. त्याने आमचे छान स्वागत करून आता पुढचे ४ दिवस मी तुम्हाला सगळीकडे फिरवणार आहे म्हणून सांगितले. हॉटेल मध्ये गेल्यावर बॅग्स ठेवून थोडे फ्रेश होऊन आम्ही लगेच  बाहेर पडलो. मी माझ्या लेखामध्ये प्रवासवर्णन न लिहिता प्रवास करताना आलेले अविस्मरणीय अनुभव इथे लिहीत आहे. त्याप्रमाणे आजपण ह्या लेखात तेच लिहिणार आहे!

तर आम्ही अबुधाबी मध्ये फेरारी वर्ल्ड ह्या अम्युझमेंट पार्क मध्ये गेलो होतो.



तशी मी खूप फट्टू बरं का! पण तरीही सगळ्या गोष्टी अनुभवायच्यापण असतात त्यामुळे प्रत्येक गोष्ट मी घाबरत का होईना पण करते! तिथे आत गेल्यागेल्याच एक उंचच्या उंच १३.५ मीटरचा  खांब आणि त्याला गोलाकार सगळीकडे खुर्च्या. आर्या व आईला त्यात बसायला परवानगी नव्हती. म्हणून आम्ही पाचजण त्यादोघींना बाहेर असलेल्या खुर्चीवर बसवून  तिथे रांगेत थांबलो.  अगोदर बसलेल्यांचे ओरडायचे आवाज आणि त्याचा वाढता स्पीड.. हृदय असे धडधडत होते की विचारायची सोय नाही. आमचा नंबर आला तेव्हा त्यात बसावे की नाही असा प्रश्न पडला होता पण जान्हवीपण माझ्यासारखी फट्टू! त्यामुळे मी काहीच म्हणूच शकत नव्हते. ती नाही म्हणत असताना तिचा हात पकडून आम्ही त्यावर बसलो. वरून एक सेफ्टी  बेल्ट येऊन आम्ही सुरक्षित झालो. अगोदर ते थोड्या उंचीवर हळूहळू वर गेले परत हळूहळू खाली आले असे २-३ दा हळूहळू करत स्पीड वाढवला आणि नंतर झुपकन वर आणि झपकन खाली. आईशपथ! तोंडातून आवाज पण निघत नव्हता, असे वाटले की आता हृदय शरीरातून बाहेर येणार आहे! पण २दा असे झाल्यावर नंतर मजा आली, छान वाटायला लागले. टर्बो टॉवरवरून उतरल्यावर मात्र थोडेसे गरगरले.




अश्याप्रकारच्या बऱ्याच राइड्स केल्या. खूप मज्जा आली, प्रत्येक राईड करताना वेगळा अनुभव येत होता. आमच्याबरोबरचे कुटुंब थोडेसे आमच्यापेक्षा वयाने जास्त होते पण तरीही प्रत्येक राईडमध्ये आम्ही एकत्र बसून खूप मज्जा केली. आई व आर्याला पण खूप साऱ्या राइड्स होत्या, तिथेपण एकत्र बसलो. टर्बो ट्रॅक, फ्लाईंग विंग्स, स्पीड ऑफ मॅजिक, टायर ट्विस्ट, ड्रायविंग विथ चॅम्पिअनस असे अनेक राइड्स मध्ये बसलो.







आता वेळ आली जगातली फास्टेस्ट रोलर कोस्टर मध्ये बसायची. स्पीड ० to २४० km/h, ५२ मी उंची. ही राईड फक्त ४.९ सेकंदामध्ये पूर्ण होते. दिसतानाच इतका भला मोठा दिसणारा कसाही कुठूनही वळलेला, खालून एकदम सरळ वर आणि वरून

खाली येताना एकदम सरळ खाली.. बघूनच भीतीने पोटात गोळा उठत होता. तिथे भली मोठी रांग होती! इथे त्यांनी आई व आर्याबरोबर जान्हवीलापण परवानगी नाकारली. मग काय आम्ही चौघेच गेलो. पोटात खड्डा आला होता तरीही त्यात बसायचीपण उत्सुकता होती. २ राईड झाल्यावर आमचा नंबर आला. बसल्यावर सगळयांचे बेल्ट घट्ट आहेत का आणि प्रत्येकाने गॉगल लावला आहे ना हे तपासल्यानंतर त्यांनी राईड सुरु केली. सुरु झाल्यानंतरच इतका जास्त स्पीड होता की घाबरून तोंडातून आवाज पण निघेना, वर जाताना माझ्या डोळयावरचा त्यांनी दिलेला गॉगल आपोआप उडून गेला. इतका जास्त स्पीड होता की त्या हवेने डोळे खराब होतील का अशी भीती वाटून आपोआप डोळे एकदम घट्ट बंद केले गेले, काहीही बघता आले नाही. आत्ताच तर बसलो होतो आणि लगेच राईड कशी संपली असे वाटून खाली उतरायला लागलो तर एकदम पडल्यासारखे झाले. बरोबर असणाऱ्या दादांना थोडा त्रास झाला आणि त्यांच्या छातीत किंचित दुखायला लागले. त्यांना आधार देऊन एका खुर्चीवर बसवले व त्यांना औषध वगैरे हवे का विचारत होतो पण थोड्यावेळाने ते नॉर्मल झाले, मी आता ठीक आहे काळजी करू नका म्हणून सांगितले. त्या भाभींना परत रोलर कोस्टर मध्ये बसायचे होते. दादांनी लगेच सांगितले,"माझी काळजी करू नका, तुम्ही तिघे जावा!" मगाशी आलेला अनुभव बघता

अगोदर मी नाही म्हणाले पण भाभी फक्त "चल ग" म्हणाल्या आणि मी लगेच तयार झाले. दादांना आई व २ मुलींबरोबर बसवून आम्ही



परत रांगेत उभे राहिलो. ह्यावेळी मात्र ती राईड आम्ही एन्जॉय केली आणि एक गोष्ट जाणवली की कुठल्याही गोष्टीची भीती वाटत असेल तर ती गोष्ट आपण लगेच करायला पाहिजे आणि हो दोनदा केली पाहिजे कारण पहिल्यांदा केली की अर्धा वेळ भीतीच वाटत राहते पण दुसऱ्यावेळी त्याची मज्जा अनुभवता येते.

तिकडून नंतर मात्र आम्ही निघालो आणि हॉटेल वर गेलो. थोडावेळ आराम करून लगेच बुर्ज खलिफा बघण्यासाठी निघालो. लिफ्ट ने आम्ही १२४व्या मजल्यावर पोहचलो. लिफ्टने जाताना इतका स्पीड होता की थोडावेळ एकदम पोटात गोळा आला. वर

पोहचल्यानंतर मात्र खूप छान वाटत होते, पूर्ण दुबई तिकडून दिसत होती. खाली बघितले की सगळे मुंग्यापेक्षाही लहान दिसत होते! थोड्यावेळाने सूर्य मावळायला लागला आणि ते दृश्य आम्ही सगळे डोळ्यात साठवत होतो. सगळे इकडे तिकडे फिरणारे, गप्पा मारणारे बऱ्यापैकी सगळे शांत झाले होते. सूर्य मावळताना थोडेसे उदास वाटत होते, एका काचेच्या खाली कठड्यावर बसून मी खूप वेळ एकदम शांत बसून बाहेर बघत बसले होते. काहीवेळानी दोन्ही लेकी 'आई का रडत आहेस' हे विचारत आल्यावर मला जाणवले की माझ्या डोळ्यात पाणी होते. का ते मात्र मलापण कळाले नाही! थोड्यावेळाने खूप छान संगीताबरोबर फाऊंटन शो सुरु झाला. मैसूरला गेलो होतो तिथे आम्ही हा शो बघितला होता त्याची आठवण झाली. छान होता शो.








शो संपल्यानंतर परत खाली जाऊन तिथे असलेल्या aquarium मध्ये व तिथल्या मॉल मध्ये भरपूर फिरलो.





तिथे अजून बऱ्याच ठिकाणी आम्ही भेट दिली आणि हो रोज रात्री दोघींना हॉटेलमध्ये सोडून भरपूर खरेदी केली. थोडीफार सोनं खरेदी पण झाली बरं का!

# केनिया मारासफरी



दोन वर्षांपूर्वी मावसजाऊ केनिया फिरायला आली होती, तेव्हा पहिल्यांदा केनिया सफारी केली.  खूप सारे प्राणी, पक्षी, तानझानिया-केनिया बॉर्डर, आणि सगळ्यात जास्त पर्यटक जुलै-ऑगस्ट ह्या महिन्यात ज्यासाठी येतात ते वाईल्ड बीस्टचे रिव्हर क्रॉसिंग पण खूप छान बघायला मिळाले. वाईल्ड बीस्ट हे तानझानियाहुन  अन्नाच्या शोधार्थ केनियाला येतात. इथे खाऊन पिऊन खुश होतात, समागम करतात आणि नंतर ते परत तानझानियाला जाऊन पिलांना जन्म देतात आणि ठरलेल्या वेळी परत पिलांना घेऊन केनियाला येतात.



केनियाच्या मारा ह्या जंगलामध्ये एक नदी आहे, नदी साधारण १०-२० फूट खाली आहे. हे बीस्ट त्यांच्याबरोबर काही झेब्रे व कॉब हेपण अन्नाच्या शोधार्थ ही नदी पार करतात. सगळेजण एकदम शिस्तीत एका रांगेत उभे असतात, कधी कधी सकाळपासून नुसतेच रांगेत उभे असतात. एका काठावरून उतारावरून खाली उतरून नदी पार करून परत तिकडून चढ चढून वर जावे लागते आणि त्यात मध्ये मगर/सिंह/चित्ता असे बरेच मांसाहारी प्राणी शिकार करायला टपून असतात. मुळातच हे खूप भित्रे, त्यात ही नदी पार करणे अवघड आणि जीव जायची भीती ह्यामुळे नदी क्रॉस करायला खूप वेळ लागतो. त्यातलाच मग एखादा तरुण बीस्ट जरा हिंमत करतो आणि एकदा एकाने खाली उतरायला सुरुवात केली की सगळेजण त्याच्यामागून पळत खाली उतरून पार करून, परत

पळतच चढ चढून वर गेल्यावर सुद्धा कितीतरी वेळ ते नुसतेच जीवाच्या आकांताने पळत असतात. त्यांच्या मनाचा विचार करताना खरेच असे वाटते की इतकी भीती वाटत आहे तर का नदी पार करता, इथे जे मिळते ते खा ना! पण तो निसर्गनियम असल्यासारखाच आहे. जे देवाने त्यांना ठरवून दिले आहे त्याप्रमाणे ते वागत असतात. आणि हो समजा नदी पार करताना एखाद्याचे पिल्लू ह्या बाजूला राहिले असेलतर कितीही भीती वाटत असतानासुद्धा त्याची आई परत दुसऱ्या ग्रुप बरोबर तिकडून नदी पार करून इकडे येऊन पिल्लाला घेऊन परत नदी पार करून दुसरीकडे जाते. आईची ममता ही पिल्लाला एकटे ठेवू देत नाही. ह्या सगळ्यात बरेच प्राणी पाण्याच्या प्रवाहामध्ये वाहून जातात, झुंड असल्यामुळे एखादा खाली पडला तर बाकीचे जोरात पळत असल्यामुळे तो त्यांच्या पायाखाली जाऊन चिरडला जातो, काहीजणांचे पाय मोडतात, काहीजण अचानक वर चढताना थांबतात आणि घाबरून वर चढता येत नसल्याने तिथेच अडकून बसतात. हे क्रॉसिंग बघून आपण खूप काही शिकून जातो.

आम्ही रिव्हरक्रॉसिंग साठी खूप वेळ उभे होतो पण बीस्ट काही रिव्हरक्रॉस  करत नव्हते शेवटी आमच्या ड्राइवरने हॉटेलला जाण्यासाठी गाडी वळवली. बीस्टना बहुतेक आमची दया येऊन लाखोंच्या संख्येने त्यांनी रिव्हर क्रॉस करायला सुरुवात केली. सुर्यास्ताची वेळ, खूप सुंदर आकाश, त्याचे बदलणारे रंग आणि त्यात हे बीस्ट लाखोंच्या संख्येने पळतानाचे दृश्य आणि त्यांचे ओरडणारे आवाज, नदी पार करताना तो पाण्याचा आवाज, नदीच्या दुसऱ्या किनाऱ्यावर पोहचल्यानंतर जीवाच्या आकांताने पळताना उडणारी धूळ आणि त्यांच्या झुंडी, इतके अप्रतिम दृश्य होते!  अगदी आमच्या डोळ्यांचे पारणे फिटले आणि आमची ही ट्रिप सार्थकी झाली.



आम्हाला चित्तीण आणि तिची पिल्ले, सिंहाचे कुटुंब, बिबट्या (जो खूप क्वचित दिसतो. त्याला एकांतात, झाडात राहायला जास्त आवडते. भूक लागल्यावर शिकार शोधताना, करताना किंवा शिकार झाल्यावर जेव्हा झाडावर शिकार ठेवून बसलेला असतो तेव्हाच तो दिसतो. पण आमचे नशीब खूप चांगले असल्याने आम्हाला तो झाडावर बसलेला मस्त जवळून दिसला), तिथे एक का दोनच गेंडे आहेत त्यामुळे तेपण खूप क्वचित दिसतात पण अगदी परत जायच्यावेळी आम्हाला गेंड्याचे दर्शन झाले. पाणघोडे आणि मगर पाण्यात डुंबलेल्या आणि काठावरपण भरपूर दिसले. हत्ती, जिराफ, झेब्रे, कॉब, वन्य पशु (वाईल्ड बीस्ट) ह्यांचे भरपूर व खूप मोठे कळप, खूप सारे वेगळे पक्षी, असे सगळेच्या सगळे प्राणी व पक्षी दिसल्यामुळे तसा आमचा प्रवास यशस्वी झाला होता पण शिकार बघायला मिळाली असती तर चार चांद झाले असते. बहुतेक नंतरच्या सहलीत ती इच्छा पूर्ण होणार होती म्हणून ह्यावेळी झाली नसेल.





कोरोनामुळे ह्यावर्षी बाहेरच्या देशातून येणारे पर्यटक नव्हते. केनियामध्ये कोरोनाची खूप भीती नसल्याने आणि हॉटेलचे दर एकदम कमी असल्याने इथे राहणारी लोक सगळ्या पर्यटनस्थळी फिरत होते. आमच्या एक खूप जवळचे कौटुंबिक मित्र देशपांडेनी ह्यांना फोन केला व हॉटेलचे चांगले दर मिळत आहेत तर आपण जाऊयात का म्हणून विचारले. मग मुलींचे परीक्षेचे वेळापत्रक बघून आम्ही दोन दिवसांनी लगेच निघालो. खाणे प्रिय असल्याने दोघींनीमिळून ठरवून भरपूर खायचे पदार्थ घेतले. हॉटेलमध्ये सगळे मिळणार होते पण वाटेत खायला म्हणून भरपूर पदार्थ घेतले होते.

सकाळी ६.३० वाजताच घरून निघालो. आदिती व आर्या जवळपास एकाच वयाच्या असल्याने त्या दोघींचे पण छान जमते आणि अनन्या सगळ्यात लहान असल्याने आमचे सगळ्यांचेच शेंडेफळ. त्यामुळे सगळे तिचे भरपूर लाड करत होते. पण जान्हवीला मात्र ह्या ट्रिपमध्ये आम्ही सगळेच खूप मिस करत होतो. गाडीत बसल्यावर गप्पांना ऊत आला. हसून हसून सगळ्यांचे पोट दुखायला लागले इतकी मज्जा केली. अधूनमधून खाणेपिणे होत होतेच. रस्ता खूप छान असल्याने आणि खूप मज्जा करत असल्याने मसाईमारा कधी आले हे कळलेच नाही इतका छान वेळ गेला. प्रवेशद्वारावर तुम्हाला चेकिंग आणि पैसे भरण्यासाठी थांबावे लागते. तिथूनच आमचे फोटोशूट सुरु झाले.




जंगलात कुठेही डांबरी रस्ता नाही, सगळीकडे त्यांनी मातीचा कच्चा रस्ता केला आहे ज्यावरून आपल्याला जावे लागते. काहीकाही ठिकाणी रस्ता चांगला नाहीये त्यामुळे गाडी उड्या मारत जात असते अगदी काही काही ठिकाणी रोलरकोस्टरमध्ये बसल्याचासुद्धा अनुभव येतो. आमचे हॉटेल जंगलाच्या बरेच आत होते त्यामुळे आम्ही त्यावाटेने जायला लागलो तोपर्यंत ड्राइवरला वायरलेसवरून कुठेतरी चित्ता दिसल्याचा मेसेज आला. मग आम्ही वाकडी वाट करून चित्ता बघायला गेलो आणि अगदी एक फुटाच्या अंतरावर ५ भाऊ एका झाडाखाली आराम करताना दिसले. झाडाच्या बाजूला एक एक करून ते बसले होते. ते बघण्यासाठी आम्ही झाडाला पूर्ण प्रदक्षिणा घालत असतानाच एक चित्ता उठून उभा राहिला आणि आमच्याकडे बघायला लागला. २ मिनिट काळजात धस्स झाले. पण लगेच खाली बसून त्याने मस्त

जांभई दिली. त्यामुळे आम्ही परत हुश्श करत हॉटेलचा रस्ता धरला.



अशक्य इतका खराब रस्ता असल्याने कधी एकदा हॉटेल येते असे झाले होते. १५ मिनिटाचा रस्ता १ तास झाला तरी पार होत नाही असे वाटत होते. एकदाचे २ वाजता हॉटेलमध्ये पोहचलो. जेवायची वेळ १ते३ असल्याने आम्हाला वेलकम ड्रिंक देऊन लगेच जेवायला सांगितले. आम्ही फ्रेश होऊन जेवलो. जेवण व्हायला ३.४०-३.५० झाले आणि सफारीला ४ वाजता जायचे असल्याने आम्ही खोलीत न जाता तिकडूनच सफारीला जायला निघालो.




हॉटेलच्या बाहेर पडलो आणि लगेच हत्तींचा झुंड दिसला. चला! सुरुवात छान झाली म्हणून आम्ही खुश झालो होतो. वाटेत जाताना जिकडे नजर जाईल तिकडे वाईल्ड बीस्टच दिसत होते. आम्ही रिव्हरक्रॉस बघायला म्हणून त्या वाटेने गेलो. बराच वेळ वाट बघितली पण त्यादिवशी काही त्यांनी नदी पार केली नाही. आम्ही मागच्या वेळेस आलो होतो तेव्हा हे क्रॉसिंग बघितले होते पण बरोबरच्या कुटुंबाला बघायला न मिळाल्यामुळे खूप साऱ्या आशा बाळगून होतो. उद्या सकाळी परत येता येईल असा विचार करून आम्ही बाकीचे प्राणी बघायला म्हणून गेलो. आम्हाला सिंहाचे कुटुंब दिसले. २सिंहीण, ४ पिल्ले आणि शिकार खात बसलेला सिंह. इथे मात्र आम्हाला एक नवीन गोष्ट कळली.





सिंह एकटाच खात बसला होता. एक सिंहीण मस्त पहुडली होती आणि पिल्ले तिच्या अंगावर खेळात होती. मध्येच ती त्या पिल्लाना चाटत होती. पिल्ले एकमेकांबरोबर पळापळी पण खेळत होती. एक सिंहीण तिथे नुसतीच उभी होती, मधूनच ती सिंह खात होता तिकडे जाऊन चक्कर मारून परत दुसरीकडे जाऊन शून्यात बघत उभी राहत होती. आम्ही आपला अंदाज बांधला की तिला बहुतेक भूक लागली असेल म्हणून ती सारखे शिकार करून ठेवली आहे तिथे चक्कर मारत असेल, मग ती खात का नसेल बरं! त्यावेळी आम्हाला खुलासा झाला की जेव्हा सिंहाचे कुटुंब असते तेव्हा प्रत्येकाच्या भूमिका ठरलेल्या असतात. त्या कुटुंबातल्या बायकांचे (सिंहीणींचे) काम मुलांना ते २ वर्षाचे होईपर्यंत सांभाळणे व कुटुंबाला खाणे पुरवणे असते. त्यामुळे सिंहीण ह्या शिकार करतात. सिंह हा कुटुंबप्रमुख असतो आणि कुटुंबाचे रक्षण करणे हे त्याचे काम असते. सिंहीण जेव्हा शिकार करतात तेव्हा त्यावर पहिला हक्क सिंहाचा असतो. एकदम फ्रेश केलेली शिकार पहिल्यांदा सिंह खातो, त्याचे पोट भरले की मग सिंहीण उरलेले खातात. खूपच आश्चर्य वाटले ऐकून. इतका मर्दगडी असतानासुद्धा आयते कसे खात असेल हा प्रश्न मात्र नक्कीच पडला.

सिंह हा कुटुंबवत्सल प्राणी आहे. जेव्हा त्यांची पिल्लं २ वर्षाची होतात तेव्हा मग त्यांच्यात सगळ्यात जो ताकदवर असतो

तो कळप शोधून  सिंहिणीबरोबर राहायला लागतो आणि आपले कुटुंब तयार करतो. बाकीचे मात्र मग भाऊभाऊ एकत्र राहतात. दुसऱ्या कळपातल्या सिंहीणी शोधतात आणि त्यांच्यात जो ताकतवर ठरतो तो त्याचे कुटुंब तयार करतो. म्हातारा झालेल्या सिंहालापण त्या कळपातून ते हाकलून देतात.  मग म्हातारे सिंह वेगळे राहतात.

त्याउलट चित्ता फक्त समागम करण्यासाठी चित्तिणीकडे जातो आणि परत निघून येतो. चित्तीण तिच्या मुलांना घेऊन राहत असते. त्यामुळे तिला पिल्लांचे रक्षण आणि त्यांची व स्वतःची खायची जबाबदारी तिच्यावरच असते. पिल्लांना सुखरूप ठेवून तिला शिकार शोधून ती स्वतःच करावी लागते. (ही सगळी माहिती आम्हाला आमच्या ड्रायव्हरने सांगितली आहे)

ह्या जंगलात आम्ही ५ चित्ता (भाऊ) आणि २ चित्ता असे वेगवेगळे भाऊ एकत्र राहताना बघितले. ह्यावेळी चित्तीण बघायला नाही मिळाली (मागच्या वेळेस मुलांसकट बघायला मिळाली होती).

जोपर्यंत तुम्ही हत्तींच्या नादी लागत नाही तोपर्यंत हत्ती काही करत नाही. हत्ती पूर्ण शाकाहारी असूनही हा ताकदवर प्राणी आहे. अगदी सिंह, चित्ते वगैरेपण त्यांना घाबरतात.

आम्ही फिरत असताना कळपातून बाहेर पडलेला एक म्हातारा जर्जर हत्ती झाडाच्या इथे उभा होता. ड्राइवरने चुकून गाडी त्या हत्तीच्या थोडीशी जवळून घेतली तर तो हत्ती एकदम जोरात आवाज काढून आमच्या गाडीवर हल्ला करणार तोपर्यंत ड्राइवर खूप जोरात गाडी मागे घेऊन जाऊ लागला.  तो गाडीच्या दिशेने



पळता पळता आम्ही त्याच्यावर हल्ला करणार नाही हे उमजून आल्यामुळे एकदम जागेवर थबकला. आम्ही बराच वेळ तिथे गाडी बंद करून उभे राहिलो आणि तो आमच्याकडे एकटक बघत उभा होता. ज्यावेळी त्याने आमच्यावरून नजर हलवली तेव्हाच आम्ही गाडी सुरु केली. खरेच सांगते खूप फाटली होती आमची तेव्हा! थोडे पुढे जाऊन ड्राइवर २ मिनिट एका जागी शांत उभा राहिला.



थोड्यावेळाने परत स्थिरस्थावर झाल्यावर त्याने आम्हाला हत्तीचा अजून एक किस्सा सांगितला. बरेच वर्षांपूर्वी असेच एका फॅमिलीला घेऊन तो आला होता, तेव्हा पुढच्याच गाडीतून एक माणूस खाली उतरून हत्तीण तिच्या पिल्लाबरोबर उभी होती तिकडे गेला. त्यांच्या ड्रायव्हरचे लक्ष गेल्यावर त्याने लगेच त्याला हाक मारली आणि पुढे जाऊ नको म्हणून सांगितले आणि गाडी सुरु केली, त्या माणसाला हत्तीकडे जाताना बघून तिथे असलेल्या बाकीच्या सगळ्यांनी पण आपापल्या गाड्या सुरु केल्या. पण तोपर्यंत त्याचे ना ऐकता 'तुला काय कळते' ह्या अविर्भावाने कॅमेरा घेऊन पिल्लाच्या अगदी जवळ गेला. त्याला बघून हत्तीण पळत त्याच्याजवळ आली, त्याला सोंडेत उचलून खाली आपटले

आणि त्याच्यावर पाय देऊन पायाखाली अगदी चिरडून टाकले. सगळेजण गाडी घेऊन हत्तीणीला घाबरावयाला पुढे जात होते पण तिच्या अंगात शक्ती संचारली होती. तो माणूस पिल्लाच्या जवळ गेल्याने पिल्लाला धोका आहे असे वाटून ती चवताळली होती. त्याला चिरडून ठार मारल्यावर ती गाडयांच्या दिशेने यायला लागली. सगळयांनी गाडी मागे घेऊन तिकडून पळ काढला. गाडीमध्ये त्याची बायको, मुलं जीवाच्या आकांताने ओरडत होते पण कोणी काहीच करू शकले नाही. तिथे govt च्या गाडया कोणी नियमाचे उल्लंघन करू नये म्हणून फिरत असतात. नेमके त्यावेळी ती गाडीपण तिथे नव्हती. थोड्यावेळाने वायरलेस वरून मेसेज मिळाल्यावर त्या माणसाला तिकडून उचलून आणण्यात तरी त्यांना यश मिळाले नाहीतर कधी कधी लांडगे येऊन ते खायची पण शक्यता असते. ऐकूनच अंगावर काटा उभा राहिला. काहीही चुकी नसताना त्या ड्रायव्हरचे लायसेन्स कायमचे जप्त केले गेले आणि त्या ट्रॅव्हल एजेन्सीला पण कायमचे बॅन केले.

अनन्याला जिराफ खूप आवडतात पण अगदी १-२ जिराफ बघायला मिळाले होते. पण हरिणींचे खूप सारे कळप खूप छान उड्या मारताना दिसले आणि  हत्ती, सिंहाचे कुटुंब, चित्ता बघायला मिळाल्यामुळे खूप नाराज न होता उद्या रिव्हरक्रॉसिंग बघायला मिळेल ह्या आशेवर आम्ही परत हॉटेलमध्ये आलो. खूप दमल्याने

रूममध्ये न जाता जेवून नंतरच जायचे असे ठरवले व तिथेच बसलो. खूप छान वातावरण होते, नंतर नंतर तर हवेत चांगलाच गारवा झाला होता. जिथे शेकोटी पेटवली होती तिथे आम्ही गुंडाळे करून बसलो आणि वेगवेगळे गेम खेळलो. जेवण सुरु झाल्यावर लगेच तिकडे गेलो. आम्ही दोन्ही कुटुंब शाकाहारी असल्याने बघूनच खावे लागणार होते. तिथे भारतीय व दुसरे पदार्थपण होते. आम्ही जिथे उतरलो होतो तिथे भारतीय जेवण खूप छान मिळते म्हणून उतरलो होतो पण नेमका त्याचवेळी त्यांचा स्वयंपाकी बदलल्याने आम्हाला तिथले जेवण इतके नव्हते आवडले पण पास्ता खूपच छान होता. मग आम्ही पास्ता, भरपूर फळे व डेझर्ट हे भरपूर प्रमाणात खाऊन पोट भरले. आम्ही बहुतेक नीट जेवलो नाही असे वाटून तिथल्या मॅनेजरने आमची काही फर्माईश असेलतर आम्ही त्याप्रमाणे डिश बनवून देऊ म्हणून सांगितले. आम्ही लगेच दुसऱ्या दिवशी लंचचा मेनू ठरवला व आम्हाला काय हवे ते सांगितले.

रूममध्ये गेलो. तर त्यांनी मच्छरदाणी घालून बेडवर हॉटबॅग ठेवून रूम छान तयार करून ठेवली होती. खूप दमलेलो असल्याने आणि सकाळी लवकर उठायचे असल्यामुळे लवकर झोपायला गेलो आणि पडल्यापडल्या झोप लागली.



आम्हाला २ ऑपशन होते - एकतर सकाळी ६-६.३० ला बाहेर पडून दुपारी ३.३० पर्यंत परत हॉटेलवर यायचे. हॉटेलमधून आम्हाला लंचबॉक्स मिळणार होते आणि जंगलात एकाठिकाणी थांबून आपण जेवूपण शकतो.

किंवा सकाळी ८-९ च्या दरम्यान हॉटेलमधून निघून १ पर्यंत जेवायला हॉटेलमध्ये येऊन परत चहा पिऊन ४ ते ६.३० ह्या वेळात सफारी ला जायचे.

आम्ही दुसरा ऑपशन निवडला होता.

सकाळी उठून तयार होऊन पोटभर नाश्ता करून निघालो. अनन्याला जिराफ बघायचे असल्यामुळे अगोदर आम्ही जिराफाच्या शोधात निघालो.  जिराफ, हरीण, काळवीट, झेब्रा, वाईल्ड बीस्ट असे बरेच प्राणी बघून आम्ही  रिव्हरक्रॉसिंग बघायला गेलो, बराचवेळ वाट बघत थांबलो होतो. खुपसाऱ्या गाड्या वाट बघत होत्या. तर एक छोटा झुंड पुढे येऊन त्यांनी रिव्हरक्रॉस केले. थोड्यावेळाने थोड्या मोठ्या कळपाने क्रॉस केले. असे १-२ कळप क्रॉस करताना बघत असताना  आमच्या छोट्या अनन्याला १ नंबर आली म्हणून मग तिथे ठरवून दिलेल्या जागी जाऊन सगळेच फ्रेश व्हायला उतरलो. तिथे खूप साऱ्या प्राण्यांची विष्ठा बघून असे वाटले की त्यांना पण इथे होऊनच मोकळे व्हायचे हा नियम माहित असावा की काय! तिथे उतरून भरपूर फोटो काढले. परत दुसरीकडे खूप मोठा कळप क्रॉसिंग करत आहे हे ऐकून तिकडे गेलो. तिकडे गेलो आणि तिथेच पण  २-३ ठिकाणाहून बीस्ट नदी पार करत होते आणि दुसऱ्याबाजूला ३ सिंह शिकार करायला टपून बसले होते. कळप इतक्या जोरात पळत असतो की शिकार करणे अशक्य असते. त्यामुळे कळपातून बाजूला झालेला एखादा प्राणी बघून त्याची शिकार करतात. असेच एक झेब्रा कळपातून सुटला आणि त्याची शिकार केली. बाजूला

खूप साऱ्या गाड्या असल्याने इतके स्पष्ट आम्हाला दिसले नाही. थोडे नाराज झालो होतो. ३ सिंहापेकी 2 सिंह ती शिकार खात होते. तिसरा सिंह अजून एक शिकार करण्यासाठी अगदी काठाच्याजवळ लपून बसला होता. नेमके एक बीस्ट कळपातून वेगळे झाले आणि सिंहाने त्याच्यावर हमला केला पण बीस्टने पण त्याच्यावर उलट हमला केला. शिंगाने हमला करून ते सिंहावर उलटून जात होते, इतके की सिंह परत मागे जात होता. पण सिंह त्याला सोडतपण नव्हता. ते पळायला लागले की लगेच पुढे जाऊन त्याला पकडायचा प्रयत्न करायचा. बीस्ट अजिबात हार न मानता एकदम जोरदार टक्कर देत होता. प्राणपणाला लावून ठरवल्याप्रमाणे बिस्ट सिंहाला असा भिडला होता की लढता लढता एकदा सिंह नदीच्या इतक्या काठावर आला की बिस्टची शिकार करता करता स्वतःच नदीत पडून त्याचाच प्राण जातो की काय असे वाटले! सिंह हरलाच होता पण तोपर्यंत दुसरा सिंह मागून आला आणि दोघांनी त्याला मध्ये घेतले तेव्हा मात्र त्याने हार मानली. एका सिंहाने त्याची मान पकडली आणि दुसर्याने दोन पाय घट्ट पकडले. जवळपास ४-५ मिनिट लागली त्यांना त्याला मारायला. हळूहळू प्राण जाईपर्यंत एका सिंहाने त्याची मान पकडून धरून ठेवली होती व दुसर्याने पाय पकडले होते. त्याचा प्राण शरीरातून निघून गेल्यावर मग एक सिंह ती शिकार खाऊ लागला

आणि दुसरा सिंह अगोदरची शिकार असलेल्या ठिकाणी गेला व तिकडे खात असलेल्या सिंहाबरोबर ती शिकार दोघेमिळून खायला लागले. खूपच वाईट वाटले बघून, उगाचच बघितले असे झाले पण हे म्हणाले अरे हीच साखळी आहे, ते मांसाहारी आहेत तर ते शिकार करून आपले पोट भरणारच ना! हा सारा प्रकार बघून एक मात्र नक्कीच शिकायला मिळाले की तुम्ही स्वतःला कधीही कमजोर समजले की तुमची शिकार सहज होऊ शकेल, पण तेच पुढचा कितीही ताकतवर असू दे न घाबरता जर तुम्ही त्याला भिडला तर तुम्ही नक्कीच जिंकू शकता! नाहीच जिंकलात तरी निदान तुम्ही त्याचा मुकाबला केला आणि हातात नसल्याने हत्यार खाली टाकायला लागले ह्याचे तरी समाधान मिळेल!





ते बघून झालेच तोपर्यंत पाण्यात २ मगरी होत्या त्यातल्या एका मगरीने वाहत जात असलेल्या एका बीस्टला पटकन तोंडात पकडून खाण्यासाठी बाजूला घेऊन जाताना बघितले.



हे रिव्हरक्रॉसिंग खूपकाही शिकवून गेले. तिथे एक बीस्ट वर चढताना एकदम थांबले, मग वर जायला त्याला भीती वाटायला

लागली. त्याच्यामागून बरेच प्राणी वर चढून गेले पण हे तिथेच थांबले होते. एकाचा पाय मोडल्यामुळे त्याला वर चढताच आले नाही, तर अजून २-३ जण पायाला लागलेले असतानासुद्धा तसेच लंगडत लंगडत वर चढले, बरेचजण पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहून गेले. एक बीस्टतर पाण्यात मध्येच थांबली होती आणि तिच्या बाळाला बोलावत होती. बाळ येईपर्यंत ती जागेवरून हलली नाही, जेव्हा पिल्लू आले तेव्हा त्याला पुढेकरून मग त्या दोघांनी दुसरीकडे चढ पार केला.  हे सगळे बघून झाल्यावर प्रत्येकजण गाडीत शांत बसून होता आणि ड्रायव्हरने पण शांतपणे गाडी



हॉटेलला जायला वळवली.

संध्याकाळी परत आम्ही सफारी ला निघालो तेव्हा खूप सारे लांडगे, जंगली मांजर, मुंगूस, आणि बाकीचे सगळे प्राणी बघायला मिळाले. आमच्या गाडीचा चालक गाडी घेऊन दुसरीकडे घेऊन

गेला होता आणि बाकीच्या गाड्या दुसरीकडे गेल्या होत्या. त्या गाड्या ज्या दिशेला गेल्या तिथे त्यांना बिबट्या बघायला मिळाला पण आम्ही दुसरीकडे गेल्यामुळे ह्यावेळी मात्र आम्हाला बिबट्या बघायला नाही मिळाला म्हणून खूप वाईट वाटत असताना बाकीचे प्राणी बघायला मिळाले असे मनाला समजावून स्वतःचे समाधान करून घेतले.

त्यादिवशी रात्री आम्ही पिझ्झा सांगितला होता. खूप छान पिझ्झा, पास्ता, फळे आणि भरपूर गोड खाऊन थोडावेळ शेकोटीजवळ बसून नंतर आदिती आणि आर्या पत्ते खेळायचे म्हणून मागे लागल्या म्हणून रूममध्ये गेलो. फ्रेश होऊन बाहेर येईपर्यंत दोघी गाढ झोपून गेल्या होत्या. आम्हीपण कंटाळलेलो असल्यामुळे लगेच झोपी गेलो.



दुसऱ्या दिवशी सकाळी निघायचे असल्याने सगळ्या बॅग्स वगैरे आवरून आम्ही रिसॉर्टवर फोटोसेशन करत असतानाच एक सुंदर छोटे हरीण तिथे उड्या मारत आले. खरेच तो सोनेरी रंग आणि त्यावर तपकिरी, पांढरे ठिपके बघून एकदम हर्षभरित व्हायला झाले आणि सीतेला त्या हरणाचा मोह का पडला असावा हे उमगले!



भरपेट नाश्ता करून जाताना एकदा परत जंगलात हिंडून गेटच्या बाहेर पडलो, आता छान ब्रेक मिळाला असल्यामुळे एकदम फ्रेश होऊन रोजचे रुटीन आनंदाने सुरु करायचा हा निर्धार करून परतीचा प्रवास सुरु केला!

मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.


मंडळी!

वाचायला तर हवंच!

www.esahity.com

www.esahity.in